# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०६**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष सातवे / अंक ७ / जून २००६

## संपादकीय

## पहाता पहाता दहा वर्षे संपली

या महिन्याच्या अंकाबरोबर व्हि. पी. एम्. दिशा ची दहा वर्षे पूर्ण होत आहेत. या दशकपूर्तीच्या निमित्ताने मागे वळून पाहणे हे स्वाभाविक आहे.

माननीय डॉ. मो. दि. पराडकर, श्री. शंकरराव मठ, श्री. प्रकाश वैद्य, श्रीमती आशा भिडे, श्री. यशवंत साने अशा अनेक लेखकांनी दिशासाठी विपुल आणि आत्मीयतेने लेखन केले. विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व सभासदांनी आणि घटक संस्थांच्या प्रमुखांनी सर्वतोपरी सहकार्य केले. ग्रंथपाल नारायण बारसे, डॉ. संजय जोशी, डॉ. मोझेस कोलेट, डॉ. पूनम कुर्वे, इ. चे सहकार्य आठवल्याशिवाय रहात नाही. या सर्वांच्या लेखन सहकार्यामुळे दिशाची वाटचाल शक्य झाली. परफेक्ट प्रिंटस्‌चे श्री. विलास सांगुर्डेकर त्यांचे सर्व सहकारी, मंडळाचे सेवक श्री. कावणकर या सर्वांनी दिशाचे काम हे स्वतःचे काम म्हणून केले. या सर्वांचा कृतज्ञतेने उल्लेख करावासा वाटतो.

हे जसे आहे, तशी काही खंतही या ठिकाणी व्यक्त करावीशी वाटते. विविध विषय शिकविणाऱ्या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी आपल्या विषयातील गती प्रगती संबंधी ज्या प्रमाणात लिहावे अशी अपेक्षा होती, ती पूर्ण झाली नाही. ठरवूनही अंक उशीरा निघत गेले. महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांपर्यंत पोहचायचे होते ते अद्याप जमले नाही या बाबींचा सखेद उल्लेख करावा लागत आहे.

अकराव्या वर्षापासून दिशाची वाटचाल अधिक चांगली व्हावी ही अपेक्षा आहे. यासाठी कराव्या लागणाऱ्या अगणित परिश्रमांची आम्हाला जाणीव आहे. 'दिशाचा अंक खूप चांगला असतो' असे सांगणाऱ्यांपासून वैचारिक लेखन करणाऱ्यांपर्यंत यापुढेही दिशाला साथ देतील असा विश्वास आहे.

विद्याप्रसारक मंडळ ही महाराष्ट्रातील अशा प्रकारचे नियतकालिक काढणारी एकमेव शिक्षण संस्था आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. दिशाच्या अनेक वाचक लेखकांकडून दिशाला सहकार्य मिळेलच. काही अंकातून आपणास एक फॉर्म पाठवीत आहोत. त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा ही विनंती !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक ७ / जून २००६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक १२वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गीता आणि व्यवस्थापनशास्त्र | डॉ. मो. दि. पराडकर | ३ |
| २) | श्री समर्थ रामदास | शं.बा.मठ | ५ |
| ३) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | यशवंत साने | ११ |
| ४) | हितगुज पालकांशी | मंजिरी दांडेकर | १८ |
| ५) | युगाचा मंत्र | प्रशांत दीक्षित | २० |
| ६) | वेध माहितीच्या उत्क्रांतीचा व विनियोगाचा | स्वप्ना बाबुराव वर्तक | २२ |
| ७) | शाळा ते महाविद्यालय - प्रवासातील विद्यार्थी | मोहन पाठक | ३२ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# गीता आणि व्यवस्थापनशास्त्र

*डॉ. मो. दि. पराडकरसरांनी गीतेचा व्यवस्थापन शास्त्राशी असणारा संबंध नेमकेपणाने या लेखात स्पष्ट केला आहे - संपादक*

व्यवस्थापन म्हणजे Management या विषयाला आधुनिक काळात फार महत्त्व प्राप्त झाले. आज महाविद्यालयात व विद्यापीठात हा विषय प्रतिष्ठेचा मानला जातो. वस्तुतः हा विषय तसा नवाच म्हणायला हवा कारण याचा विकास गेल्या दोनशे वर्षातच झाला, परंतु गेल्या २५-३० वर्षांत हार्वर्ड इन्स्टिट्यूट, एशियन इन्स्टिट्यूट (फिलिपाइन्स) आणि अहमदाबाद मधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या आधुनिक काळातल्या प्रतिष्ठा प्राप्त संस्था, यांचे शुल्क लक्षावधी रुपयांचे आहे. यांचे पाठ्यक्रम यशस्वी रितीने पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना वाव ही भरपूर आहे. धनदायक व्यवस्थापनाशी याचा अर्थात् जवळचा संबंध हे उघड आहे.

हे सर्व मान्य करूनही मुळात जीवनाचे व्यवस्थापन करण्याची कल्पना मात्र ज्ञानाची परंपरा असणाऱ्या भारतात नवीन मानता येणार नाही. प्राचीन काळी मनुष्याचे आयुर्मान शंभर वर्षांचे मानले जात होते. त्याच्या जीवनाचे चार टप्पे- ब्रह्मचर्य, गार्हस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास साधारणपणे प्रत्येकी २५ वर्षांचे, या टप्प्यांतल्या कर्तव्यांची विभागणी हाही जीवनाच्या व्यवस्थापनाचाच विचार मानायला हवा. पहिल्यात विविधांगी जीवनाला सामोरे जाण्याची मानसिक तयारी म्हणजे विद्यार्जन, दुसऱ्यात हे ज्ञान गृहस्थाश्रम स्वीकारून या मानसिक तयारीचे प्रात्यक्षिक यात व्यक्तिगत कर्तव्या बरोबर सामाजिक जबाबदाऱ्या समर्थपणाने पेलण्याची अपेक्षा, तिसऱ्यात स्वार्थापेक्षा लोकांच्या कल्याणाची जबाबदारी अधिक प्रमाणात अंगावर घेण्याची प्रवृत्ती वाढवत जाणे आणि चौथ्यात संपूर्ण जीवनाचा समाज पुरुषासाठी होम करण्याची सिद्धता, यालाच संन्यास हे नाव देऊन व्यक्तिगत जीवनाचे विलीनीकरण म्हणजेच 'शेवटचा दिस गोड व्हावा' ही अभिलाषा व्यक्त केली गेली. हे व्यवस्थापनच नव्हे का ?

या दृष्टीने Management is getting things done through and with people ही व्यवस्थापन शास्त्राचे गेल्या पिढीतले आधुनिक भाष्याकार पीटर ड्रकर यांची व्याख्या गीताकारांनी साधलेल्या प्रयोजनाशी जुळणारीच आहे. कारण गीतेत कृष्णाने अर्जुनाकडून युद्ध करवून घेतले आणि हे करतांना जीवनाला सामोरे जाण्याची अर्जुनाचीच नव्हे तर सर्व जिज्ञासूंची तयारी करुन घेतली असे म्हटले पाहिजे. अर्जुनाची निवड करण्यात ही मानवी वर्तन (Human behaviour) गुणात्मक संरचनेवर अवलंबून आहे याची जाण दिसते. संपूर्ण भारतीय दर्शनाची मांडणी ज्या त्रिगुणात्मिका प्रकृतीवर अवलंबून आहे त्यात सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण. यांपैकी कोणत्या गुणाचे प्राधान्य काम करणाऱ्या व्यक्तीत आहे यावर त्याचे कौशल्य (Skill) आणि दृष्टिकोण (Atthimdel) ठरत असतो आणि यावर त्याला प्रेरित करण्यातले औचित्य निर्धारित होते. दुर्योधन किंवा शिशुपाल यांना प्रेरित करुन उपयोग होण्यासारखा नव्हता, कर्ण हा यांच्यापेक्षा उजवा हे खरे परंतु त्याच्या बाबतीत रजोगुणोत्पन्न अहंकार आडवा आला असता हे सर्व योगेश्वर कृष्णाने ओळखले आणि रजोगुण किंवा तमोगुण यांचे अडसर बाजूला सारुन सत्त्वगुण प्रधान कर्म

करण्याची शक्यता ज्याच्या बाबतीत सर्वाधिक त्या अर्जुनाला युद्धाची प्रेरणा दिली.

अचूक निर्णय घेऊन तो अंमलात आणण्यासाठी धर्म-अधर्म, कार्य-अकार्य व्यवस्थित समजून घेणारी सात्विक बुद्धी अर्जुनाच्या ठिकाणी आहे. गीतेच्या ही व्यावसायात्मिका बुद्धी आणि ती एकेह कुरु नंदन (२-४९) असते. या उलट अव्यवसायिक बुद्धी गीतेच्याच मृणुया अनंत आणि बहुशाखा/विखुरलेली ) असते. (२-४९)

**योगशास्त्र आणि व्यवस्थापन शास्त्र**

गीतेचा योगाशी जवळचा संबंध आहे हे सर्वमान्य आहे. योगप्रक्रियेची मांडणी सहाव्या अध्यायात केलेली आहे. वस्तुत: 'योगी भवार्जुन' असा कृष्णाचा उपदेश आहे. या अध्यायातल्या १७व्या श्लोकात योगी हा खऱ्या अर्थाने दु:खाचा नाश करु शकतो असे म्हणताना योगेश्वर कृष्ण म्हणतो :-

युक्ताहार विहरस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दु:ख हा ॥

आहार आणि विहार या बाबतीत संतुलन योग्याने स्वत: साधले पाहिजे. इतरांना शिस्त लावू इच्छिणाऱ्या व्यक्तीने स्वत:ला शिस्त लावून घेतली पाहिजे. मित आहार आणि मित विहार योग्यालाच नव्हे तर व्यवस्थापकाचाही असला पाहिजे, त्याने स्वत: संतुलनाचा आदर्श ठेवला पाहिजे. खाणे आणि उपभोग घेणे यावर नियंत्रण ठेवणे हे आजच्या व्यवस्थापकाला अत्यावश्यक आहे, हे जर त्याला जमले नाहीं तर त्याच्या शब्दात वजन रहाणार नाही. मोक्षमार्गावर चालू इच्छिणाऱ्या योग्यापेक्षा ही प्रलोभने बेसुमार वाढलेल्या या काळात व्यवस्थापकाला हे पथ्य पाळलेच पाहिजे. आज तरुण वयातच व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारावी लागत असल्यामुळे तर आहार आणि विहार यातले संतुलन साधणे सोपे राहिलेले नाही हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. थोडक्यात हा स्वयंशिस्तीचा भाग आहे, उत्तम व्यवस्थापनाचा हा ओनामा आहे.

परंतु एवढ्यावरच भागणार नाही. प्रत्यक्ष व्यवस्थापन करतांना प्रत्येक क्रियेत गुंतवणूक किती हे ही त्याला ठरवावे लागेल. यातही 'युक्तत्व' असले पाहिजे. गुंतवणूक अजिबात नसणे हे निष्क्रियतेचे लक्षण ठरेल आणि ती वाजवीपेक्षा जास्त असेल तर अनुयायांना त्याची चीडच येईल, म्हणून या बाबतीतही 'अति सर्वत्र वर्जयेत्' या उक्तीनुसार 'युक्तत्व' श्रेयस्कर.

परंतु युक्तत्वाची पूर्णता व्यवस्थापकाच्या दृष्टीने ज्यांचे व्यवस्थापन करायचे त्यांच्याशी वागण्याच्या पद्धतीनुसार ठरवायला हवी. यासाठी या श्लोकांतला पुढचा शब्द 'युक्तस्वप्नावबोधस्य' महत्वाचा. स्वप्न म्हणजे झोप आणि अवबोध म्हणजे जागृतपणा किंवा जागरूकता. चांगल्या व्यवस्थापकाने अनुयायांच्या स्वाभाविक त्रुटींकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती आणि 'अवबोध म्हणजे त्यांनी केलेल्या चांगल्या कामांची जाण ठेवून त्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याची सवय लावून घ्यायला हवी. Getting things done यासाठी या दोन्हींची आवश्यकता आहे. व्यवस्थापनाप्रमाणे योगशास्त्रात ही या दोन्हीचे संतुलन अपेक्षित असते. योग्याची एकाग्रता म्हणजे जशी निद्रा नव्हे तसेच त्याला विवेकाचे भान ही ठेवावे लागते. व्यवस्थापनात तर स्वप्न व अवबोध यांबाबतीत 'युक्तत्व' पाळले नाही तर व्यवस्थापकाला अनेक संघर्षांचा सामना करावा लागेल आणि यशाला गालबोट लागेल हे उघड आहे.

तसे पाहिले तर हे एका दृष्टीने नेतृत्वाचे गुणच आहेत, चांगला व्यवस्थापक हा अनुयायांचा नेता असला पाहिजे त्याला उपयुक्त गुणांचा समर्पक उपयोग करण्याची कला

पृष्ठ क्र. १० वर

# श्री समर्थ रामदास

*समर्थांनी कार्यकर्त्यांविषयीचे विचार व्यक्त केले आहेत. आजच्या सामाजिक राजकिय पार्श्वभूमीवर या विचारांचे महत्व विशेष असे आहे. शंकरराव मठ या लेखात समर्थांचे विचार समजावून सांगत आहेत - संपादक*

### कार्यकर्त्यांनी पाळावयाची पथ्ये

महाराष्ट्र धर्माची मुख्य तीन अंगे -१) हरिकथा निरुपण २) सर्व विषयी सावधपण आणि ३) नेमस्तपणे राजकारण, समर्थांनी या तीनही विषयी खूप खोलवर विचार केला होता. त्यांच्या मते आणखी एका अंगाचा विचारही तितकाच महत्त्वाचा आहे. तो म्हणजे साक्षेपाने नाना आक्षेप फेडावे. नाना मतांचे, विविध प्रकृतीचे लोक ठायी ठायी कार्यकर्त्याला भेटतात. या सर्वांचे समाधान केल्याशिवाय व त्यांची हृदये आपल्या वाक्-चातुर्याने आपलीशी केल्या शिवाय समुदायाला घेऊन कोणाही कार्यकर्त्याला वा महंताला पुढे जाताच येणार नाही. कार्यकर्त्याने व महंताने याला कंटाळून चालणार नाही. उलट उत्साहाने त्याने हे कार्य केले पाहिजे. काही लोक वारंवार तेच प्रश्न विचारतात. चिकित्सक मंडळी भलतेच प्रश्न पुढे करतात. त्यामुळे खवळून जाऊन राग करु नये. तर अत्यंत शांतपणे त्यांचे समाधान करावे. कंटाळून जाऊ नये. विवरलेचि विवरावे। पुन्हा निरुपण। तैसे आम्हास घडले। बोललेचि बोलणे पडिले। काजे बिघडलेचि घडले। पाहिजे समाधान (११/५/१) नानाकिंतु निवारिले। नाना संशायो छेदिले। नाना आशांका फेडिले। नानाप्रश्न। हाच दंडक हाच नियम पाळला पाहिजे असे समर्थांचे सांगणे आहे. या प्रमाणे ओजस्वी पण तितक्याच नम्र व गोड बोलाने हजारो जनवृंद आपलेसे करावे.



### सेवक कसा असावा

विरक्त, नि:स्पृह, तेजस्वी, निर्भय वृत्तीचे कार्यकर्ते अलौकिक असे वीर होत. प्रत्यक्ष रणांगणावर मर्दुमकी गाजवणारे हे वीर नव्हते. पण प्रसंगी गुप्त रुपाने कार्य करणाऱ्या महंताने तेजस्वीपणाने प्रकट होण्यास कचरु नये. देशासाठी, धर्मासाठी, वैराग्याची व त्यागाची भगवी छाटी अंगावर चढविलेले ब्रह्मचारी तरुण समर्थांना अपेक्षित होते. ते म्हणत, 'हा धकाधकीचा मामला। कैसा सोसे अशक्ताला। सर्व बुद्धी शक्ताला। म्हणोनि सांगाव्या' (१९/१०/३२) पण महंत केवळ शक्तिसंपन्नच नव्हे तर ज्ञान, वैराग्य, निस्पृहता, सावधानता, चातुर्य, युक्ती इत्यादी गुणानी मंडित असले पाहिजेत. हे सारे गुण सांप्रतही अत्यंत उपयुक्त असल्याने समाज कार्यकर्ता व धर्मोपासक यांच्या ठिकाणी या गुणांची नितांत आवश्यकता आहे याचा विचार व्हावा.

समर्थ म्हणतात ज्याला आपल्या भोवती हजारो जनसंमर्दाचे जाळे विणून काही कार्य करावयाचे आहे अशा कार्यकर्त्या पुरुषाच्या मनाची बैठक अत्यंत खंबीर, तेजस्वी व स्थिर असली पाहिजे. समाजाचे सूत्रचालन, प्रवर्तन वा आंदोलन करुनही जो ध्रुवताऱ्या सारखा अढळ राहतो

त्याच्या ठिकाणी प्रामुख्याने दोन गुण असले पाहिजे. समाजाला हालवू शकतील असे बोल व हृदये शुद्ध करणार जाज्ज्वल्य उपदेश. पहिला गुण म्हणजे प्रबोधनशक्ती आणि दुसरा कोणाच्याही अंत:करणाला धक्का न लावता कार्य करणे. थोडक्यात बहुतांचे मनोगत राखणे. हा गुण दुर्मिळ पण तितकाच महत्वाचा आहे. 'या कारणे मनोगत। राखीण तो मोठा महंत। मनोगत राखता समस्त। थोडो न येतो।' (१३.१०.२९) प्रबोधन शक्ती बद्दल बोलताना म्हणतात 'बोलण्या सारखे चालणे। स्वये करुनि बोलणे। तयाची वचने प्रमाणे । मानिती जनो। (१२/१०/३९) अशा प्रकारच्या मनुष्याच्या कळकळीच्या बोलाला किंमत दिली जाते असे कर्मवीर समर्थांना हवे होते.

### परिभ्रमण व भिक्षावृत्ती

देशाटण केल्याने अंगी चातुर्य बाणते आणि भिक्षार्य वृत्तीने घरोघर होणाऱ्या परीक्षेने व अवलोकनाने त्यांच्या हृदयात स्वकार्याची जळती ज्योत अधिकच तीव्रतेने तेवत राहाते. म्हणून ते म्हणतात, नि:स्पृहता भिक्षे पासून। प्रगट होय। नित्यनूतन हिंडावे। उदंड देशाटण करावे। तरीच भिक्षा मागता बरवे। श्लाघ्यवाणे। काही भिक्षा आहे म्हणावे। अल्प संतोषी असावे। बहुत आणि घ्यावे। मुष्टी एक (१४/२/२०) अर्थात ही पोटासाठी भीक नव्हती. अशा प्रकारे संचार करुन बऱ्या वाईट लोकांचा शोध करावा. गाव असो खेडे असो परीक्षण केल्या वाचून सोडू नये. भिक्षेच्या मिषाने घर न घर परीक्षून सोडावे.

### अलिप्तपणा

आपले कार्य गुप्तपणे करता येते. दुसरी गोष्टी सुख दु:खापासून अलिप्त राहून कर्तव्यासाठी भूमिका वजविता येते. समर्थ म्हणतात, 'उद्वेग अवघे तुरेनि जाती। मनास वाटे विश्रांती। ऐसी दुर्लभ स्थिती। विवेके सांभाळावी।' (१९/८/२६) केल्याने होत आहेरे। आधी केलेची पाहिजे। येत्न तो देव जाणावा। अंतरी धरिता बरे। 'कष्ट करा पण कष्टी होऊ नका कारण जे कराल ते होईल. असे सामर्थ्य तुमच्यात आहे. प्रत्यक्ष आत्मसाक्षात्कार करुन घेण्याचा अधिकार स्वत:त असलेल्या माणसाने सामार्थ्याचा प्रत्यय न घेता दुबळे पणाच्या गोष्टी सांगाव्यात याहून दीनपणा तो काय? म्हणून विवेक पूर्वक उदंड कष्ट केल्याने फलप्राप्ती होईल हा स्फूर्तिदायक आदेश समर्थांनी दिला आहे.

### एकांत सेवन आवश्यक

हा विवेक, हा विचार, ही दूर दृष्टी ही अखंड चालना गलबल्यात होणे शक्य नाही. त्याला शांत असा एकांतच पाहिजे. म्हणून या साठी एकांताचा आश्रय प्रत्येक महंताने वा कार्यकर्त्या पुरुषाने करावा. एकांतात आत्मा शांत होतो. प्रसन्न होतो, अवघड वा कठीण कार्य असले तरी त्याचा विचार हळूहळू सुचून सर्व गोंधळ काढून टाकतो. असा एकांताचा महिमा आहे. म्हणून आवश्यक तेव्हा एकांताचा आश्रय करावा असे समर्थ शिष्याना सांगतात. 'अखंड तजविजा चालणा जेथे। पाहता काय उणे तेथे। एकांते विण प्राणियाते। बुद्धी कैंची अखंड एकांत सेवावा। ग्रंथ मात्र धांडोलावा। प्रचीत येईल तो घ्यावा। अर्थ मनी (१८/३/२०) एकांतात चाळणा करुन कार्याचा निश्चय करुन कार्यकर्त्या पुरुषाने कार्यावर तुटून पडावे

### समर्थांनी राष्ट्र बांधणीचे कार्य का स्वीकारले?

शरीराने व मनानेही दुर्बल झालेली जनता आपल्या अवतीभोवती पाहून अशा मुमुर्षु राष्ट्रपुरुषाच्या देहात चैतन्य ओतण्याचे कार्य त्यानी अंगीकारले कारण राष्ट्रे कधी मरत नसतात हे त्यांना पक्केपणाने माहीत होते. प्रत्येक राष्ट्रात चैतन्यशक्ती असते. ती कधी सुप्त कधी जागृत. त्या सुप्तशक्तीला जागृत करणारा तडफीचा खरा कर्मवीर, खरा कार्यकर्ता मिळाल्यास ते राष्ट्र खडबडून जागे होते. याच जाणिवेने ते म्हणतात 'गुप्त तेचि प्रगटवावे । असाध्य तेचि साधावे। कानडेचि अभ्यासावे निरतंर जागे केल्यानंतर पुढचे काम सोपे होते. म्हणून ते म्हणतात वन्हि तो चेतवावा रे।

चेतविताचि चेततो। या प्रमाणे समार्थांनी प्रत्यक्ष आपल्या उज्वल रामभक्तीच्या, दुर्दम्य देशभक्तीच्या अलोट उत्साहाच्या चैतन्याचा अग्नी समग्र महाराष्ट्रात पेटवून दिला.

**कार्यकर्त्यांनी कसे वागावे**

नुसती व्याख्याने देऊ नयेत, कार्य करावे. ते करीत असताना दुसऱ्यावर अवलंबून राहू नये. आपल्या पूर्वजांची सतत प्रौढीही मारू नये. तर स्वत:च कर्तबगारीने त्यांचे वंशज होण्यास आपण लायक आहोत हे आपल्या कार्याने पटवून द्यावे. केवळ पूर्व वैभवाच्या गुणगानाने कार्य उभे राहात नसते. आपल्या कार्याने पटवून द्यावे. आपल्या कार्यास बळकटी येण्या इतपतच त्याचा वापर करणे योग्य, पण तसे नसल्यास कोणाच्याही कुळातला मनुष्य आपल्या मनगटाच्या व बुद्धीच्या जोरावर नाव कमवू शकतो. असेच समर्थांना सांगावयाचे आहे. स्वत:च्या सद्गुणावर पाहता पाहता कीर्तीचे शिखर गाठणारे आपल्या आसपास दिसत असता केवळ पूर्वजांचे पोवाडेच गात बसण्याने काय बरे साध्य होणार आहे. असा समर्थांचा रोकडा सवाल आहे. कर्णाचे वचन ध्यानी आणा-दैवयत्तं कुले जन्म मदायत्तन्तु पौरुषम्। पुढे उद्धृत केलेल्या संस्कृत श्लोकातही हाच आशय आढळेल - किं जन्मना च महता पितृ पौरुषेण। शक्त्या हि याति विजया पुरुष: प्रतिष्ठाम। कुंभा न कूपमपि शोषयितुं समर्थ:। कुंभोध्दवेनमुनिना अंबुधि: एव पीत:। एखाद्या घागरीला विहीर देखील शुष्क करता येत नाही पण ज्याचा जन्म घागरीच्या माध्यमातून झाला तो अगस्ति संपूर्ण समुद्रालाच शुष्क करतो. म्हणून असे काही कार्य करा जेणे करुन स्वत:चे व जगताचे कोट कल्याण होईल. केवळ बडबडीवर पूर्वज्यांच्या वैभवाच्या गप्पांवर यश प्राप्त होत नाही. म्हणून समर्थ म्हणतात. कष्ट करण्यास तयार व्हा. निव्वळ बडबड करु नका. पूर्वजांच्या पोकळ बढाया मारु नका किंवा दुसऱ्यावरही काम ढकलू नका कारण जो दुसऱ्यावरी विसंबला। त्याचा कार्यभाग बुडाला (१९/१/१६).

मरणात खरोखर जग जगते.

कार्य करत असता मृत्यू ओढवला तर काय करावे? समर्थ सांगतात मरावे परि कीर्ति रुपे उरावे। नामर्द बनणे योग्य नाही. खरा मर्द तो जो मृत्यूला मुळीच भीत नाही. आपल्या सत्कार्यात येणाऱ्या मृत्यूला तो मातीच्या मोलाने मोजण्यास तयार होतो. संताचे वचन विसरुन कसे चालेल? देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो। समर्थ म्हणतात देशभक्ती तीच देवभक्ती किंबहुना विश्वात कोंडून राहिलेल्या त्या विश्वंभरांची पूजा, विश्वातील भूतमानवाच्या सेवेनेच होते. हा महाराष्ट्र धर्माचा सिद्धांत प्रतिपादला गेला असून मराठ्यांचे ब्रीद दाखविणारे 'मरेंगा पर हटेंगा नही' वचन तेच दर्शविते. हे वचन पानिपतच्या युद्ध प्रसंगी नजीब खानाला उत्तर देताना दत्ताजी शिंदे यांच्या वचनात आढळून येते. 'बचेंगे तो ओर भी लडेंगे' याने महाराष्ट्र धर्मच सिद्ध होतो.

प्रभूसाठी आत्मार्पण करावे. देवाच्या बळावरच देशकार्य करावयाचे आहे. किंबहुना देव आणि देश एकच आहेत. देशतो देव जाणावा। विश्वताच विश्वात्म्याचा वास आहे. हे लक्षात ठेवावे समर्थ म्हणतात. देवाच्या सख्यात्वाकारणे। आपुले सौख्य सोडून देणे। अनन्यभावे जीवे प्राणे शरीर तेही वेचावे देवाच्या अरण्यावासी पाडाण्या जिवळगासी तुटी। सर्व अर्पावे शेवटी। प्राण तोही वेचावा आपुले अवघेचि जावे। परी देवासी सख्य राहावे। ऐशी प्रीती जीवे भावे। भगवंती लगावी (दशक ४ समास ८) रणांगणातून पळ काढला असता मृत्यू तुम्हाला मारणार नाही काय? असे आहे तर आपले यश मलीन का करता?

**शिष्याच्या ठिकाणी परोपकारी गुण असावा**

जागोजागी भजन महोत्सवाची व यात्रेची मौज दृष्टीस पडावी त्यात हरिभक्ती बरोबरच राजकारण विलसावे ही समर्थांची उत्कट इच्छा होती. या गोष्टीस लोकसंग्रह अवश्य होता. हा महाराष्ट्र धर्माचा प्राण, त्या धर्माचे व्यावहारिक

आराध्य दैवत म्हणजे जनसंदर्भ होय. म्हणूनच ते म्हणतात देव म्हणजे आपुले प्राण। प्राणासि न करावे निर्वाण। ही उक्ती जनास व जनार्दनास सारखीच लागू पडते. आणि या साठीच शरीर परोपकारी लावावे। बहुतांच्या कार्यास यावे। उणे पडो ने दावे। कोणी एकाचे । (११/१०/६)

आपले अथवा परावे। कार्य अवघेचि करावे। प्रसंगी कामास चुकवावे। हे बरे नव्हे।। (१२/१०/२१) या प्रमाणे परोपकाराची पराकाष्ठा केल्यास आपल्या कार्याला लोक समुदाय साहाजिकच साथ देईल. आपले कार्य सुलभ होईल. यासाठी उपकार व प्रेमळ वागण्याने सर्वांना राजी राखावे कारण ती मंडळी तुमचीच आहेत असे समर्थांचे शिष्यांना सांगणे होते.

इतके प्रेमाने वागले असतानाही अपमानाचे, निंदेचे, आणि धिक्काराचे शब्द बोलून तोंड सुख घेणारे निंदक, दुर्जन मंडळी कार्यकर्त्यांना भेटतील. अशा दुर्जनांचे तोंडसुखही दुर्लक्षित करून आपण शांत राहावे व त्यांना शांत करावे. त्यांना या गोष्टींची कधी ना कधीतरी उपरती होईल असा विश्वास बाळगावा असा समर्थांचा कळकळीचा उपदेश आहे. कार्यकर्त्यांत उदात्तता असावी तरच त्याला कोणत्याही परिस्थितीत आपले नियोजित कार्य करणे सोपे जाते, समर्थ या विषयी म्हणतात- उदंड धिक्कारुनी बोलती। तरी चळो द्यावी न शांती। दुर्जनासी मिळोनी जाती। धन्य ते साधु। हा उपदेश कार्यकर्त्यांनी सतत लक्षात ठेवावा. ही साधुत्वाची वृत्ती सोडून चालणार नाही, सर्व साधुसंत याच तोडीचे होऊन गेले म्हणूनच त्यांना दिव्य कार्य करता आले. तुकाराम म्हणता - तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात । निंदक हे छळणारच पण प्रभाव मात्र त्या साधुचा पडतो. व तो अखंड, चिरकाल टिकतो. अशा प्रसंगी सज्जनतेचा शुद्ध व्यवहार कसाला लागतो. मग तो शंभर नंबरी सोन्याप्रमाणे अधिकच तेजाने तळपू लागतो. हा विचार अत्यंत उदात्त व खोलवर परिणामकारक असा आहे.

वर विवेचन केलेल्या गुणांचा साकल्याने विचार केला असता यातील प्रत्येक गुण कार्यकर्त्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आणि आवश्यक आहे. गुणांचा समुदाय ज्या कार्यकर्त्यात एकवटलेला आहे तो काय करणार नाही? उत्कटत्वाने यातल्या कोणत्याही गुणाचे टोक गाठले असता कार्यकर्ता यशस्वीपणे कार्य करु शकेल कारण उत्कट गुणात वा गुणाच्या उत्कटतेत अलोट सामर्थ्य वास करीत असते. त्या गुणाच्या प्रभावाने लोकांचे चित्त निःसंशय आपल्या बाजूला खेचल्या वाचून राहणार नाही समर्थ म्हणतात - उत्कट भव्य तेचि घ्यावे। मळमळीत अवघेचि टाकावे। निःस्पृहपणे विख्यात व्हावे। भू मंडळी । (१९/६/१५) म्हणून शिष्यांना ते आवर्जून सांगतात, कोणत्याही गुणाचा कळस गाठा, तर (विजयश्री) दूर नाही, ही शिकवण धरित चित्ती । सर्व सुखे ओळ गती। अंगी बाणे मंहती। अकस्मात। (१४/१/८०)

**समर्थ उपदेश सार**

उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास शिकवावे। उदंड समुदाय करावे। परी गुप्तरुपे। अधिकार पाहोन कार्य सांगणे। साक्षेप पाहोन विश्वास धरणे। आपला मगज राखणे । काही तरी (११/१०/२३) शरीर परोपकारी लावावे। बहुतांच्या कार्यास यावे। उणे पडोचि ने दावे। कोणी एकाचे (१२/१०/५) दुसऱ्याच्या चाळी चालावे। दुसऱ्याचे बोली बोलावे। दुसऱ्याच्या मनोमनीजावे। मिळोनिया। जिकडे तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे हा विवेक।

या उपदेशात भाग्यवान बनण्याचे सामर्थ्य आहे. या प्रमाणे दिव्य उपदेश शिष्यांना करणारे समर्थ त्या प्रमाणे अक्षरशः वागले. शारीरिक, बौद्धिक आणि आत्मिक सामर्थ्याचा निवास ज्यांचा ठायी आढळतो ते खरोखरीचे समर्थ होते. समर्थ पदवीची व्याख्या करताना स्वामी रामदास दासबोधात म्हणतात जो बहुत जणास चालवी। नाना मंडळे

हालवी। ऐसी हे समर्थपदवी। विवेके होते। १८/५०/४६ अर्थात् हे काम सामर्थ्य संपन्न पुरुषाचेच आहे. शारिरिक सामर्थ्याबरोबर बौद्धिक व आत्मिक सामर्थ्य एकवटले पाहिजे, या त्रिवेणी संगमात अवगाहन महत्मा तो असेल तर फारच उत्तम समर्थ त्या तोडीचे होते, हे निःसंशय.

समर्थांनी सांगितलेल्या महाराष्ट्रधर्माचे गुण म्हणजेच त्या धर्मचंद्राची एक एक कलाच. या कला विकसित होऊन पूर्ण सोळा कलांनी संपूर्ण वैभवाने पौर्णिमेच्या दिवशी विलसणाऱ्या चंद्राला पाहताच सागराला जशी भरती येते त्याच प्रमाणे पूर्ण धर्मचंद्राचे दर्शन घडताच जनसागरही हेलावून न जाईल तरच नवल असे घडणे नैसर्गिकच आहे. समर्थासारख्या राष्ट्रभक्त संतांची ही स्थिती तशीच आहे याबद्दल समर्थ एका ओवीत म्हणतात - आहे तरी सर्व ठायी। पाहोजाता कोठेच नाही। जैसा अंतरात्मा ठायीचा ठायी। गुप्त जाहला।

अशा प्रकारचा हा दिव्य महाराष्ट्रधर्म असून त्याच्या मंत्राची फुंकर समर्थांनी महाराष्ट्र जनतेच्या हृदयात मारल्याबरोबर, महाराष्ट्र-जनता खडबडून जागी झाली. आणि तिने शिव प्रभूच्या कार्यात अलोट साहाय केले. हा महाराष्ट्र धर्म विसरुन कसा चालेत. महाराष्ट्र धर्म स्थापना करुन त्याची चोहोबाजूनी राखण केली. समर्थांनी कार्यक्षम असे एकंदर हजाराबर मठ स्थापन केले. त्यात बाहत्तर मठ मुख्य होते. बहुतेक मठपति ब्रह्मचारी होते. अशा प्रकारे समर्थांच्या देखरेखी खाली तयार झालेले शिष्य सर्व देशभर संचार करीत होते. त्यांच्या शिकवणीचा विचार केला असता सारे शिष्य स्वदेश, स्वधर्म स्वबांधव यांच्या कल्याणासाठी सर्वत्र फिरणारे व्रतीच होते.

वयाच्या ३६ व्या वर्षी म्हणजे शके १५६६ साली ते कृष्णाकाठी चाफळ खोऱ्यात आले व तेथून कार्यास प्रारंभ केला. त्यांनी प्रथमची बारा वर्षे जांब गावी काढली त्यानंतर चोवीस वर्षे भगवद् भक्तीची साधना केली बारा वर्षे पुरश्चरण व बारा वर्षे तीर्थाटण करुन चाफळ खोऱ्यात वास्तव्याला आले. तेथून राष्ट्रोध्दाराचे हे कार्य देवकार्य म्हणूनच त्यांनी केले. अंखड जयाचे चित्त। परमेश्वरी। (१४/४/९५)

## उपसंहार

सुमारे साडेतीनशे वर्षा पूर्वी महाराष्ट्रात असा सत् पुरुष होऊन गेला. त्याने आपल्या एकट्याच्या हिताचा सर्वस्वी त्याग करुन आपल्या आयुष्याची चोवीस वर्षे भगवत् प्राप्ती करुन घेण्यात घालविली. आणि उर्वरित आयुष्य स्वबांधवांच्या स्थितीचे चिंतन करण्यात व त्यांच्या आत्मोन्नतीचे उपाय शोधण्यात दऱ्या खोऱ्यात घालविले. गुरु शिष्य संवादरुपाने दासबोध हा ग्रंथ लिहिला. बोध म्हणजे महाराष्ट्र धर्माचे शिक्षण होय. असले शिक्षण देणारा प्राकृतात तरी एवढाच ग्रंथ आहे. इतर पारमार्थिक ग्रंथाप्रमाणे यात अध्यात्म निरुपण असून शिवाय त्या ग्रंथातून जे नाही ते यात आहे. हाच या ग्रंथात व इतर ग्रंथातला फरक होय. ब्रह्मचर्याचे, रामभक्तीचे आणि तारुण्याचे तेज, त्यांच्या नसानसातून अभिव्यक्त होत होते. स्वदेश, स्वधर्म यांच्या अभिमानाने त्यांचे हृदय अहर्निश जळत होते. आपल्या तेजस्वी वाणीने त्यांनी मेलेल्या हाडातूनही चैतन्य उत्पन्न केले. हे कार्य करुनही प्रसिद्धी पासून दूर राहिले. दास डोंगरी राहतो। असेच त्यांच्या बाबतीत घडले.

आपल्या शिष्यांना योग्य उपदेश करुन त्यांच्या साहाय्याने सर्व महाराष्ट्रभर स्वातंत्र्याचे स्वधर्माचे, स्वभाषेचे निशाण फडकविले. शिव प्रभूंना साहायक होईल अशी भूमी तयार करुन ठेविली. परकीय सत्ता असल्याने हे सारे गुप्त रुपाने केले. समर्थ म्हणतात-

मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा।
ये विषयी न करता तकवा। पूर्वज हासती।
धर्मासाठी मरावे। मरोनि अवध्यासि मारावे।
मारता मारता घ्यावे। राज्य आपुले।

या स्फूर्तिप्रद उपदेशाप्रमाणे त्या मराठे वीरांनी सतीचे वाण घेऊन महंमदीय शासनाविरुद्ध झगड केला. शिव प्रभूंनी दक्षिणेतील मोंगलाई बुडवून महाराष्ट्राचे आनंदभुवन केले. त्या महाराष्ट्रात धर्म, स्वदेश व अभिमानाचे चित्र समाजमनावर जे कोरले होते ते सुफलित झालेले पाहण्याचे भाग्य समर्थांना लाभले. आनंदाच्या भरात ते म्हणतात - बुडाला औरंग्यापायी । म्लेंछ संहार जाहला । मोडिली मांडली क्षेत्रे । आनंदवन भुवनी । उंदड झाले पाणी । स्नान संध्या करावया ।

शिवबा समर्थांच्या अगोदर गेले. शिवबांच्या निधनाने समर्थांनी हाय खाली त्यांच्या आग्रहावरुन ते सज्जन गडी राहावयास आले होते. शिवबाच्या पश्चात संभाजी राजे यांना उपदेश केला तो चिर स्मरणीय असा आहे, त्यात ते म्हणतात.

शिवरायस आठवावे। जीवित तृणवत मानवे।
इह परलोकी राहावे। कीर्तिरुपे।
शिवरायाचे आठवावे रुप शिवरायाचा आठवावा प्रताप।
शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळी।
शिवरायाचे कैसे चालणे। शिवरायाचे कैसे बोलणे।
शिवरायाची सलगी देणे। कैसे असे।
सकल सुखाचा त्याग। करुनि साधिजे तो योगा।
राज्य सुखाचा त्याग। करुनि साधिजे तो योग।
राज्य साधनाची लगबग। कैसी असे ।
त्याहून करावे विशेष । तरीच म्हणावे पुरुष।
या उपरी आज विशेष । काय लिहावे।

समर्थांनी शके १६०३ मध्ये इह लोकीची यात्रा संपविली

जय जय रघुवीर समर्थ -

- शं.बा. मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

पृष्ठ क्र. ४ वरुन

**गीता आणि व्यवस्थापनशास्त्र**

साधली पाहिजे. गीतेचे भाष्यकार आचार्य शंकरांनी 'अर्जुनं निमित्तीकृत्वा' श्रीकृष्णा ने सर्वांनाच धर्म आणि अधर्म यांचा विवेक करण्याची शिकवण दिली आणि गीतेच्या शब्दात स्वत: 'योगेश्वर' असल्याची खात्री पटवली. व्यवस्थापन शास्त्रात हि 'युक्ताहारविहारस्य ...योगो भवति दुःख हा' या श्लोकात आज सर्वमान्य असलेल्या व्यवस्थापनशास्त्राची त्रिसूत्री सांगितलेली दिसते, या दृष्टीने हि गीता सांगणारा कृष्ण हा 'योगेश्वर' ठरतो हे मान्य केले पाहिजे.

डॉ. मो. दि. पराडकर

**ग्रंथसंपदा :** दासबोध, आत्माराम व मनाचे श्लोक याशिवाय आरत्या व इतर अनेक स्तोत्रे व स्फुटकाव्य. समर्थांची सारी रचना स्वतंत्र आहे. एकूण रचना साडेसव्वीस हजार भरते. टीकापर अगर अनुवादपर असे काहीही लिहिलेले नाही.

**समर्थांचे व्यक्तिमत्त्व व कार्य :-** नाकीडोळ नीटस, बलवान, कणखर, शरीरयष्टी मजबूत, बांधा भव्य, वर्ण गोरा, चपळता असे समर्थांचे तेजस्वी व्यक्तित्व होते. श्रीराम व हनुमान ही समर्थांची आवडती दैवते होती. यांनी ठिकठिकाणी राममंदिरे, मारुती मंदिरे, बलोपासनेसाठी व्यायामशाळा, आखाडे याची स्थापना केली. भक्तिमार्गाचा प्रसार हे त्यांचे जीवनध्येय होते. प्रपंच परमार्थाची सांगड हे त्यांचे वैशिष्ठ्य होते. स्वधर्मरक्षण व धर्मप्रचारासाठी लोकांचे संघटन व मठस्थापना हे त्यांचे कार्य होते. महाराष्ट्र धर्माचे प्रवर्तक, श्रेष्ठ कवि, आदर्श शिक्षक, सद्गुरु, श्रेष्ठ संघटक, भगवंताचा परम भक्त, महायोगी व राजगुरु, राष्ट्रसंत म्हणून प्रसिद्ध आहेत.

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*वैदिक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

**यज्ञ संकल्पना**

दिशाच्या मागील लेखात 'यज्ञ' ह्या वैदिक साधनेची थोडीशी भूमिका मांडली. पण, ती अत्यंत प्राथमिक स्वरुपाची होती. सध्याच्या समाजात 'यज्ञ' संकल्पनेबद्दल जे पूर्वग्रह, गैरसमजूती व निव्वळ राजकीय क्षुद्र हेतू आहेत, त्यांच्या प्रचंड गदारोळात 'हिंदू संस्कृतीत 'यज्ञ' ह्या वैदिक संकल्पनेची' जी अवहेलना होते आहे, त्या संबंधीची चर्चा होती.



**अवहेलना**

ही 'अवहेलना' ह्या संस्कृतीबद्दल राजकीय किंवा सामाजिक समूहाकडून होते आहे एवढेच नसून ह्या 'यज्ञ' संकल्पनेचा, अंतर्गत आध्यात्मिक क्रिया, व त्याचा बाह्य आकार व प्रतिकात्मक स्वरुप, यामध्ये 'विकृती' आणणारा, 'अज्ञानी हिंदू' समाज, पुरोहित व वेदांनी पंडित, ह्यांचाही समावेश होतो आहे.

**यज्ञ रहस्य**

त्यामुळेच 'यज्ञ' ह्या अत्यंत मूलगामी मूलभूत व तेजस्वी संकल्पनेच्या बद्दल जास्त खोलवर व त्यांतील रहस्य, गूढ व आध्यात्मिक सत्य सांगण्याचा मी प्रयत्न करत आहे. विश्वाच्या प्रचंड व्यवहाराकडे मानव अचंबित होऊन पहात आहे. युगानुयुगे ह्या विश्वसंचाराचे स्वरुप, चलन, योजना व उद्दिष्टे, ह्याबद्दल त्यांचे रहस्य शोधण्याचे प्रयत्न चालू आहेत.

पण, ह्या प्रयत्नांना यश आले आहे, असे सांगणाऱ्या 'भौतिक विद्वानांना व शास्त्रज्ञांना', त्यांतील कांही व्यवहाराची चित्रे अवगत झाली, तरी त्यांच्या रचनेचा जन्म व प्लॅन कोणी, कां व कसा केला, याचे कणभरही ज्ञान झालेले नाही. त्यांच्या संशोधनाची पातळी ही भौतिक उपयुक्ततावादी ज्ञानापुरतीच संकुचित राहिली आहे. रॉकेट मधून चंद्रावर गेलो, तरी त्याच्या पृथ्वीवर प्राप्त झालेल्या इंधनात शक्ति कुठून आली, हवेला मागे ढकलले किंवा जेट पद्धतीने वायू मागे ढकलला की रॉकेट पुढे जाते, चंद्राच्या गुरुत्वाकर्षणाच्या क्षेत्रात आले व वेग कमी केला की अवकाशयान खाली उतरता येते वगैरे शोध, फक्त त्यांची व्यवहारिकता दर्शवितात. हे मूलभूत संशोधन नव्हे. 'अवकाशयान' म्हणजे रॉकेट नव्हे - अवकाश या आध्यात्मिक कल्पनेचे हे सामान्यीकरण आहे !!

**सनातन जिज्ञासा**

पण, ह्या विश्वाच्या निर्मितीच्या मागे ज्या शक्ति

आहेत त्यांची वैदिक ज्ञानांत 'इच्छाशक्ति, ज्ञानशक्ति व क्रियाशक्ति' अशी विभागणी केली आहे. वैश्विक शक्तिला या स्वातंत्र्यात्मक गुणत्रयी आहेत.

### चैतन्यशक्ति विशेषता

भौतिक विज्ञानांत अश्या तऱ्हेची कोणतीही स्वतंत्र इच्छा वा अंतर्गत, अंतर्भूत ज्ञान ह्या शक्तिला असेल, अशी भावना नाही. त्यांना 'शक्ति' ही एक मानवाच्या यांत्रिक गुलामपद्धतीत वावरणारी चीज होय. तिला 'स्वातंत्र्य' नाही. मानवाला स्वत:लाच 'मर्यादित स्वातंत्र्य आहे, त्यामुळे त्याला 'मर्यादित' स्वरुपाच्याच चीजा सर्वत्र पसरल्या आहेत असे वाटते - अगदी नैसर्गिकपणे !!

पण, हा भलामोठा गैरसमज व अज्ञान आहे. प्राणी, वनस्पती व मानवी जीवनात जे चैतन्य आहे, ते जरी मर्यादित व वैश्विक पद्धतीशी बांधलेले असले, तरी एका मात्रेपर्यंत ते इच्छा व ज्ञान व क्रिया स्वातंत्र्य भोगत असते.

### वैश्विक यज्ञ

मग, ह्या विश्वाच्या संसारामागे ही जी शक्ती स्वतंत्र निर्मितीच्या क्षेत्रात उभी आहे. त्या शक्तीची एक विलक्षण योजना 'यज्ञ' ह्या संकल्पनेमागे आहे. ह्या विश्वाच्या चराचरात पसरलेल्या सर्व चेतन व अचेतन गोष्टी एका तत्वाने बांधलेल्या आहेत. ते तत्त्व म्हणजे त्या प्रत्येक चीजेमध्ये ह्या शक्तिचा अंश 'पूर्णरुपात' पण अंशरुपाने आहे. काही चीजांमध्ये त्या शक्तिच्या तीन विभागांतील प्रत्येक अंश देखील कमी जास्त प्रमाणांत विखुरलेले आहेत.

पण, मुख्य गोष्ट म्हणजे त्या परस्परांशी अतूटपणे अंतरंगात जोडलेल्या आहेत, परस्परपूरक कार्य ह्या वैश्विक शक्तिच्या योजनेत संकल्पलेल्या पद्धतीने होण्यासाठी बांधलेल्या आहेत.



### Mutual Exchange Relation

आणि, मुख्य म्हणजे त्यांचे स्वत:चे भौतिक अस्तित्व जरी मर्त्य शरीरात व आकारात मर्यादित असले तरी त्यांच्या जीवनातील प्रत्येक क्षण एका 'त्यागाच्या तत्वाने' बांधलेला आहे. ही त्यागाची व समर्पणाची भावना ही प्रत्येक चेतन, अचेतन शक्तीशी जोडलेली आहे. आणि ह्या व इतर अशा अनेक गूढ तत्वांनी बांधलेली ही 'विश्वसंकल्पना' एक भव्य व दिव्य उद्दिष्टासाठी सतत, युगानेयुगे कार्य करत आहे हे कार्य ह्या सर्व चेतन व अचेतन वस्तू व चीजा एका 'महान यज्ञाच्या' स्वरुपांत पार पाडत आहेत.

### ऋषी नारायण रचित पुरुष सुक्ताचे स्पष्टीकरण

पण, हे एखाद्या सामान्य व्यक्तीच्या दृष्टीत उघडपणे दिसत नाही. पुरुषसुक्तात ह्या निर्मीतीचे वर्णन केले आहे.
''यत्पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत

वसंतो अस्यासीदाज्यं ग्रीष्म इध्म: शरद्धवि: ॥६॥

नारायण ऋषी च्या ऋग्वेदांतील 'पुरूषसुक्त' (मंडल १०/९० वे सुक्त) इतरही वेदांत याचे उल्लेख आहेत. पुरुष सुक्तातील १६ मंत्रांची, पूजेतील १६ उपचारांशी सांगड घातली गेल्याने साधकाला ह्या सूक्तांतील रहस्याचा शोध घेण्याची व यज्ञ क्रियेच्या वैश्विक योजनेबद्दलची जाण प्राप्त व्हावी अशी योजना सामाजिक हिंदू संस्कृतीत अत्यंत कुशलतेने केलेली आहे.

### प्रचलित अपूर्ण अर्थ

ह्या सुक्ताचा अर्थ श्री. गजानन बाळकृष्ण दंडगे यांनी असा केला आहे. -

''देवानी या पुरुषरूपी हविर्द्रव्याने जो (जेव्हा) यज्ञ आरंभिला, तेव्हा त्या यज्ञाचे वसंत ऋतु हे 'आज्य द्रव्य (तूप) होते. ग्रीष्मऋतु या समिधा होत्या आणि शरदऋतु हे पुरोडाशादि हविर्द्रव्य होते. (आज्य :- यज्ञाग्नी प्रज्वलित ठेवणे ही क्रिया तुपाने होते म्हणून तूप आज्य (आ+अञ्ज् = माखणे) यज्ञपर यजुर्वेदांत घृत हे 'आज्य' नावाने वावरु लागले.

इध्म = वाळलेले, पुरोडाश = सातुचे पीठ दुधात कालवून भाजणे. हा यज्ञ म्हणजे एक Cosmic action experiment होय. आता यातील खरे ज्ञान प्राप्त होण्यासाठी साधक किंवा यज्ञा च्या यजमानाने आपल्या प्रगल्भ कल्पना शक्ति. (Intut on) ची योजना करुन 'अव्यक्त' unmanifest जगात ही क्रिया कशी व कोणत्या भावार्थाने झाली असेल ह्याची 'क्रिया' (योगिक, आंतरिक) (Neuro-Cultural-Biological) करण्याची आवश्यकता आहे.

### ज्ञान संक्रमणाची बैठक

पण, language भाषा ह्या शास्त्राची बैठकच मुळी, ज्ञान मिळवणाऱ्या वाचकाच्या, साधकाच्या 'अनुभव सामुग्रीवर' अवलंबून असते.

त्यामुळे पृथ्वीवर जन्मलेल्या सर्वसामान्य माणसाची 'अनुभवाची बेगमी' नारायण ऋषीनी जमेस धरलेली दिसते. त्यामुळे वसंतात सृष्टिनिर्मीतीमध्ये जी जीवनाची निर्मिती क्रिया नैसर्गिक पद्धतीने होते. झाडांना पालवी फुटते व फळे, फुले बहरतात. कोकिळेला कंठ फुटतो वगैरे वगैरे - त्या क्रियेच्या नामरुपबरहुकूम समांतरपणे व कल्पनेने यजमानाच्या अंतरंगात, अंतर्मनात, चैतन्यात Consciousness मध्ये एक 'यज्ञक्रियेची कृती व क्रिया' व्हावयाला हवी आहे. विश्वामध्ये जशी क्रिया झाली, तिचे Similitude किंवा Model हे नारायण ऋषी, ह्या संकल्पनेचे अत्यंत सूक्ष्म, सापेक्ष, प्रतिकात्मक व Provoking (उत्तेजक) प्रेरणात्मक वर्णन करत आहेत.''

पुढे श्री दंडगे काय सांगतात ते पहा.

''वसंत ऋतुच्या आगमनाने वनस्पतींना पालवी फुटते, त्याप्रमाणे 'आज्याहुतीने' यज्ञाग्नीला ज्वालांची पालवी फुटते. म्हणून सृजन-यज्ञात'', (Creation Yajna) ''वसंत ऋतु 'आज्य बनला. समिधा (इध्म) शुष्क हव्यात. ग्रीष्माने समिधा शुष्क बनतात. म्हणून तो या यज्ञात 'इध्म' बनला. हविद्रव्ये मुख्यत: उद्भिज अन्नपदार्थ असल्याने अन्नसिद्धीचा शरद ऋतु लक्षणेने 'हवि' बनला, अशा प्रकारे या दैवी यज्ञाने नवनिर्मीतीची पूर्वसिद्धता झाली'' पुढची ऋचा या रहस्यावर आणखी भाष्य करते.

तं यज्ञं बर्हिषि प्रोक्षन पुरुषं जातमग्रत: ।

तेनं देवा अयजन्त साध्या ऋषयश्च ये ॥७॥

त्या सृष्टीपूर्वीच जन्मलेल्या, यज्ञसाधनभूत पुरुषाला दर्भावर ठेवून साध्य-देव व ऋषि यांनी त्यावर प्रोक्षण, मंत्रजलाने केले, आणि त्याच्यायोगाने यज्ञ केला'' 'यज्ञ' ही संकल्पना विश्वनिर्मितीच्या अगोदर 'Mystic Operative System' म्हणून अवगत असावयाला हवी. नाहीतर, पुरुषसुक्तातील ह्या विराटपुरुषाच्या (Sacrifice) यज्ञाची व

निर्मितीची वर्णने, जादुई व स्वप्नाळू व कपोलकल्पित वाटण्याचा पुष्कळच संभव आहे. हे मान्य करावयालाच लागेल. पण, प्रथम ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की ज्या सीमित बुद्धीच्या व आयुष्याच्या मानवाला हे ज्ञान आकलन व्हावयाचे आहे, तो स्वत: ह्या निर्मितीचा एक 'निर्मित घटक' आहे आणि त्याला आपल्या निर्मितीच्या प्रयोगाच्या पाठीमागच्या दिव्य व अलौकिक अश्या गुंतागुंतीच्या व कठीण संकल्पनेची माहिती व ज्ञान त्याला हवे आहे.

## दोन भिन्न डोळे

माझ्या असे लक्षात येते की ज्या वैदिक ऋषींनी 'यज्ञ' संकल्पना मांडली त्यांची ज्ञानाची पद्धती ही Intutive साक्षात्कारी, Transcendental Capacity ची होती. उलट ज्या मानवाला हे ज्ञान हवे आहे. त्याच्या आकलनशक्तीला अत्यंत कठोर भौतिक मर्यादा आहेत.

म्हणूनच, ह्या भौतिकेत अडकलेल्या जड ज्ञानाच्या सीमेत ज्ञानाच्या मर्यादाश्रित असलेल्या मर्त्य मानवाला, कदाचित पाश्चात्य 'जड ज्ञानपद्धतीचा' परिचयात्मक भाषा जवळची वाटेल.

## Antonio Nicolas

Antonio Nicolas या बाबतीत काय म्हणतात ते पाहूया "Certain technologies have come down to us as mystical and yet are the conditions for any creative human Act.

"The veil of the **epistemology of Nature** over the epistemology of the **Will of God**, has been so complete that individuals find it almost impossible to talk of anything that is not 'Natural'. थोडक्यात निकोलस अँटोनियो असे म्हणतात की आध्यात्मिक (Mystic) ज्ञानपद्धतींनी अंगिकारिलेली तंत्र पद्धती ही परंपरेनी ऐतिहासिक पद्धतीने आपल्यापर्यंत आली आहे, आणि तिच्यामार्फतच केवळ मानवाला सृजनक्रियेचे ज्ञान व कृती उपलब्ध आहे. "Nature" ह्या शब्दाचा इथे विवक्षित अर्थ लावला आहे. दैवी व मानवी ज्ञानपद्धतीत एक पडदा आहे.

"Since Plato and Aristotle, through Kant and Husserl, "Nature" was the foundation of public discourse and inquiry. It controlled the public domain, since the only language available was a translation into "the language of nature of any Kinds of experience and findings."

ह्याचे ढळढळीत आजकालचे उदाहरण म्हणजे एखाद्या प्रिय व्यक्तीच्या विरह भावना समजण्याकरिता फक्त Mathematics, Physics व Computer चाच वापर हा यथायोग्य होऊ शकेल का? इथे यंत्राची किंवा एका भौतिक शास्त्राची भाषा हृदयाची व्यथा समजण्यास असमर्थ आहे. आजकालच्या राजकीय सत्तेच्या धारणेत, कोणतीही चळवळ, समाजसुधारणेची समजा ही केवळ धर्मनिरपेक्ष Secularच असावयाला हवी अशी धारणा आहे नाही का? पण, गुणप्रवृत्तीतील बदल धर्माच्या साधनेतच जास्त सामावलेला आहे. ही 'भाषा' म्हणजे विचारप्रवाहाची धारा होती. निकोलस यांच्या भाषेत Natural बुद्धीवादी (प्रचलित) म्हणा हवे तर. पण, दुर्दैवाने 'परमेश्वराची अभिप्रेत ज्ञान पद्धती व भाषा व मानवाची प्रचलित ज्ञानपद्धतीत अर्थातच मोठा दरी आहे व 'जमीन अस्मानाचे' अंतर आहे.

त्यामुळे, जे मानवी ज्ञानपद्धतीत बसत नाही किंवा सांपडत नाही, ते 'असत्य' आहे, असे म्हणता येणार नाही. 'यज्ञ संकल्पनेत जे ज्ञान प्रवाही होण्याची कृती आहे व ज्या ज्ञानाचे संक्रमण होणार आहे, ते या कोड्यांत गुंतलेले आहे. हा गुंता सोडवावयाचा असल्यास मानवाने आपल्या 'संकुचित बुद्धीवादाच्या' पलीकडे छलांग मारण्याचा प्रयत्न करावयालाच लागेल.

तसेंच हा 'पुरुष' म्हणजे ही विश्व विराट संकल्पना मुळांत आली कोठून व ती स्वयंनिर्मित व स्वयंप्रवाही कशी.

असे प्रश्न स्वाभाविकपणे पडतील. हे प्रश्न ज्या बुद्धीला पडतात, त्या बुद्धीची उडी कुठपर्यंत आली आहे, ते पहाणे योग्यच ठरेल. "Our task to find" Human strategies in complexity" is directed by using scientific thinking. Our culture "has always included scientific rationality as its basic value. (stepin 2003 : 109). But, Since 20th Century there have been growing doubts about the Role of Rationality often the difference between "Understanding" (Verstand) and "Reason" (Vernunft) is forgotten. Rightly, the sole use of understanding is criticised, but we have a hard time using reason."

**Intution or Intellectuality ?**

महत्त्वाचे काय आहे ? सत्य ज्ञान का 'बुद्धीवादाची प्रतिष्ठा व अहंकार ? सत्य जाणणे हे महत्त्वाचे होय ना, मग इथे बुद्धी आपल्याला अतोनात कष्ट देते आहे!! ईश्वरी ज्ञान किंवा अव्यक्त जगाचे ज्ञान व इतर गूढ प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाही आहे. असमर्थ आहे ! ऋग्वेद रचनेच्या काळात वैश्विक सत्य ज्या 'साक्षात्कारी' आणि 'अनुभूतीशास्त्र' (Science of realisation) यांच्या आधारावर जाणण्याची क्षमता होती तिचा ऱ्हास क्रमाक्रमाने होत गेला व त्याऐवजी मानवी बुद्धी व त्यावर आधारलेल्या भौतिक नैसर्गिक क्रियांच्या दर्शनावर मानवी ज्ञानाची भाषा बुद्धीगत होऊ लागली. त्याचाच एक मोठा अविष्कार म्हणजे उपनिषदांतील बुद्धीगम्य भाषा व तर्कपद्धती. त्यामुळे सध्याच्या भौतिकवादी स्तरावर असणाऱ्या मानवाला व समाजाला उपनिषदांची भाषा समजते. पण, समजली तरी, त्याची पुढची उडी मात्र मानवी मनाच्या व हृदयाच्या गूढ प्रक्रिया शक्तीवरच विसंबून रहावे लागते. शिवाय हे मन, हृदय सुद्धा शुद्ध, पारदर्शक, सात्विक व योगिक संस्कारित असावयाला हवे!!

**अश्वमेध**

उदाहरणार्थ 'अश्वमेध यज्ञ घ्या. इथे 'अश्व' ह्या शब्दाचा खरा अर्थ : दिव्य चैतन्य शक्ति, प्राणशक्ति, मानसिक व Vital. शक्ति असा आहे. संस्कृत व्याकरणांतील भौतिक व्यवहारातला अर्थ 'घोडा' असा आहे व तो तसा लावला असतां या यज्ञाचा जो आध्यात्मिक अर्थ आहे तो बिलकुल प्राप्त होणार नाही व घोड्याचा बळी देण्याचा अत्यंत मंदबुद्धी पुरोहितांकडून जो यज्ञसंस्थेला विकृत अर्थ प्राप्त झाला त्यावरची गौतम बुद्ध काळातील सामाजिक प्रतिक्रिया सर्वांना ज्ञात आहे. आश्चर्य म्हणजे त्या यज्ञाचा खरा आध्यात्मिक अर्थ प्राप्त न झाल्याने व दोन्ही बाजूच्या अज्ञानी भूमिकेमुळे, हे शतकानुशतके चालणारे वाद, अजूनही त्याच स्तरावर स्थित आहेत. देवदुर्विलास, दुसरे काय म्हणावयाचे ?

ऋग्वेदांत ऋचा (1.162) मधले 22 मंत्र आणि (1.163) 13 मंत्र हे दीर्घतमस् ऋषिच्या नावावर आहेत. देवता: अश्वः, छंद - त्रिष्टुप्, जगती आहे.

हा दीर्घतमस् ऋषि म्हणतो आहे कीं "आत्मानं ते मनसारादजानामवो दिवा पतयन्तं पतंङ्गम् ॥

शिरो अपश्यं पार्थभि: सुगेभिर रेणुभिर्जेह मानं पतत्रि ॥१॥२२।१६३।६॥

हे अश्व ! मी तुझे शरीर मनानेच जाणले आहे. तुला "आकाशात उडताना पाहिल आहे. तू 'धूळरहित' मार्गावरुन जाण्याचा प्रयत्न करत असतोस. अत्यंत द्रुत गतीने जाताना शिर उंच ठेवत रहातोस."

इथे गुरुकिल्ली (कुंजिका) कोणती तर ऋषि त्याला 'मनानेच' जाणतो. म्हणजे हा पृथ्वीवरचा घोडा हा देहधारी प्राणी नव्हे तर !! ह्या ऋग्वेदामधील गुरुकिल्लीचा अर्थ व विस्तार बृहदअरण्यक उपनिषदात पहिल्या अध्यायात पहिल्याच श्लोकात सापडतो.

"ॐ । उषा व अश्वस्य मेध्यस्य शिर: ।

सूर्यचक्षु: वात: प्राण:, व्यासमग्निर्वैश्वानर:,

संवत्सर आत्माश्वस्य मेध्यस्य। द्यौ: पृष्ठम, अन्तरिक्षमुदरम्, पृथिवी पाजस्यम्, ... (वगैरे)"

ह्याचे स्वामी जगदीश्वरानंद व माधवानंद व आद्य श्री शंकराचार्यांच्या टीकेसहित भाषांतर. SRI Ramkrishna Math ह्यांनी उपलब्ध केले आहे.

"Om, The head of the sacrificial horse is verily the down, the eye of the sacrificial horse is the sun, the vital force the air, the open mouth the fire named Vaishwanara, the trunk the year (संवत्सर), the back the heaven, the bellly the sky, the hoof the Earth ... (etc)"

आता उषा हे तोंड, सूर्य हा डोळा, हवा ही 'बल', मुख हा "वैश्वानर अग्नि" (ही आणखी एक पोटकल्पना) सगळ्यात बेफाट कल्पना त्याची शेपटी हे वर्ष, पाठ हा स्वर्ग, पोट हे आकाश आणि त्याच्या टापा (Hoof) हे पृथ्वी!!

म्हणजे आपण ह्या 'घोड्याच्या टापाखाली पृथ्वीवर आहोत. मग असा हा घोडा कोणता? किंवा मग 'अश्व' ह्याचा खरा अर्थ काय? आणि त्याच्या शरीराचे अवयवाचे हे जे भाग 'यज्ञीय अग्नि' ला हवन वा अर्पण केले त्याचा अर्थ काय ? ह्या सगळ्या विधीचा फायदा काय ? कोणाला? हे व्यवहार Laws, Excharges कोणी रुढ केले ? ह्यावर अंमल कोणाचा ?

**Which Laboratory ? प्रायोगिक क्षेत्र**

उपनिषद सुद्धा ह्या सीमेवर येऊन थांबतात. यज्ञाच्या या प्रतिकांवर आधारलेल्या प्रक्रिया ह्या कुठल्या 'क्षेत्रात' (Laboratory) होतात ?


असे प्रश्न पडत नाहीत. कां ? कारण, 'यज्ञ' हा व्यवहारच एका Make believe stage भूलभुलैया स्तरावर पाळला जातो आहे, असे मला दाटपणे सुचवावयाचे आहे.

पण, आशेचा एक किरण पाश्चात्य विद्वानांकडून व शास्त्रज्ञाकडून येतो आहे. हा वर्ग आहे की ज्यांचा वैदिक ज्ञानावर पूर्ण विश्वास आहे - आपल्याहूनही कणभर जास्तच!!

त्यामध्ये एक नाव अँटोनियो निकोलास यांचे डॉ. मिस्टर अँटोनियो टी. डी. निकोलास, PHD, ह्यांचे स्पेन, इंडिया व युनायटेड स्टेटस् इथे शिक्षण झाले. ते भारतात १२ वर्षे होते. ऋग्वेद, भगवद्‌गीता, मेडीटेशन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांचा जास्त अभ्यास हा तत्वज्ञानाच्या संदर्भात "Act of Imaging" कल्पना शक्तिचा (ध्यान धारणेत) वापर हा आहे. ते सध्या Professor Emeritus of Philosophy at the State university at Story Book आहेत.

### परिशिष्ट क्रमांक - २

(संदर्भ - पृष्ठ क्रमांक ३७ ते ४२)



मला असे वाटते की 'यज्ञ' ह्या वैदिक संकल्पनेचा जो विशेष अभ्यास आपण करु इच्छितो आहोत तिथे त्यांच्या दृष्टिकोनाचा फायदा व्हावा.

'यज्ञ ह्या संकल्पनेची' बहिर्गत पद्धती आपल्याकडे अनेक प्रकाराने प्रचारात आहे. ऋग्वेद, उपनिषद व ब्राह्मणे ह्यांच्या संहिता हजर आहेत. भारतीय समाजाची 'यज्ञ' ह्या संकल्पनेबद्दल उलट, सुलट मते ही प्रचारांत आहेत व यज्ञावर धूसर श्रद्धा असणारा समाज म्हणजे 'धर्मनिरपेक्ष राजकारणी' मंडळीही हजर आहेत व यज्ञ संस्थेत प्राणी जीवन देण्याच्या पद्धतीबद्दल आरोप व विरोधही व्यक्त झाला आहे व त्यावर सांप्रदायिक 'घट्ट' मतेही बाळगणारे राजकीय पक्ष आहेत.

काय नाही आहे ? 'यज्ञं ह्या वैदिक संकल्पनेची अत्यंत ताकतीने उभी केलेली स्वरुपे 'विकृत' स्वरुपात सांभाळली जात आहेत व त्याच्या मूळ, शुद्ध, आध्यात्मिक कल्पनेकडे कोणी संशोधक वृत्तीने बघु इच्छित नाहीत.

'यज्ञ' ह्या प्रयोगाचा विलक्षण आध्यात्मिक उद्देश हा मानवाला त्याच्या मर्त्य, शरीर बंधनातुन, षड्रिपू (अहंकार, द्वेष, मद, मत्सर, वगैरे विकारी मन वा बुद्धीच्या सापळ्यातून, मानवी शरीराच्या इंद्रियांच्या मर्यादित क्षमतेमधून, भौतिक जगालाच विश्व मानणाऱ्या अज्ञानी विश्वासातून, पृथ्वी हाच ग्रह हा चैतन्याचा एकमेव अविष्कार व क्षेत्र आहे हे मानणाऱ्या शिशूकल्पनाशक्तीतून, मनाच्या प्राणी स्तरावर असलेल्या पातळीवरून, एका अतींद्रिय उच्च मानसिकतेच्या स्तरावर ह्या विश्वाचे व विश्वरचनेचे व कार्यभाराचे दर्शन देण्याची 'यज्ञं, ही युक्ती आहे. 'आध्यात्मिक उंचीचा' हा अर्थ आहे. व्यावहारिक मनाच्या पातळीवर ह्या श्रेष्ठ प्रणालीचा अर्थ उमगत नाही.

### उपहास

तेव्हा ही युक्ती 'भारतीय समाजात' का निष्प्राण झाली, टाकाऊ किंवा चेष्टेचा, विकृतीचा विषय का झाली, निरुपयोगी का झाली त्याचा विचार आपण विस्ताराने करु. त्यात 'भारताच्या आध्यात्मिक उन्नतिचा' उपहास ज्या कारणाने झाला त्याची चर्चा करु. राजकीय, सामाजिक, नैसर्गिक आपत्त्या आल्या त्याचाही विचार करु.

### बालबुद्धी व प्रगती

पण आश्चर्याची एक गोष्ट आहे की ह्या विश्वाच्या निमंत्रकाला या गोष्टींची माहिती नसेल हा शिशुबुद्धीचा गैरसमज आहे. ज्या जगातील विभागाला किंवा समाजाला आपण Exclusive materialistic एकांगी भौतिकवादी संबोधतो, त्या जगांतील काही 'भौतिक वैज्ञानिक प्रगतीच्या 'शोधांनी' मानवाला ह्या भौतिक मानवाला, त्याच्या 'सनातन प्रश्नांच्या', उत्तरांच्या जवळ आणण्याची कामगिरी चालू केली आहे.

ह्या घटनांची संगतवार माहिती पुढच्या लेखात देण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत.

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट
अग्यारी लेन, ठाणे - ४००६०१.
टे. नं. २५३६८४५०
E-mail : yrsane@eth.net Mbl : 9892046539

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# हितगुज पालकांशी

*चित्रकलेला बालपणीच खतपाणी घालायला हवं. त्याचा पाया पक्का करायला हवा. चित्र काढत असताना मुलं नुसतीच रेघोट्या मारुन रंग भरत नसतात, त्यांच 'घडण' ही त्याच वेळी चालू असतं. त्यामुळे पुढील आयुष्यातील कित्येक अभ्यासक्रमात, व्यवसायात काम सुलभ होतं. कित्येक विद्यार्थी व पालकांना चित्रकलेचं महत्त्व वाटत नाही. खर तर डॉक्टर, इंजिनीअर्सना चित्रकलेशिवाय पर्याय नसतो. मानवी शरीराची रचना असो व एखाद्या यंत्राची रचना असो, चित्राद्वारे ती समर्थपणे समजावून सांगता येते. - संपादक*

शिक्षण हे समाज परिवर्तनाचं प्रभावी साधन आहे. या साधनाचा जाणिवपूर्वक वापर केला तरच त्यातून काही साध्य होतं. तीच गोष्ट कलेची. कलेचा वापर झाला नाही तर त्या साधनालाही गंज चढेल. त्यादृष्टीनं शालेय चित्र शिक्षण हे अखिल राष्ट्राला सुशिक्षित करण्याच्या कार्याचं एक उपांग व्हावयास पाहिजे. या विषयाच्या शिक्षणाचं ध्येय कलाकार, निर्माण करणं हे नाही. पण प्रतिभा, कल्पना, भावना, विचार विस्तृत आणि संपूर्ण होण्यासाठी नुसत्या शब्दानं भागत नाही. त्यातील अपुरेपणा भरुन काढण्यास चित्रासारखं दुसरं साधन नाही. श्रेष्ठ कविवर्य व चित्रकार श्री. रविंद्रनाथ टागोर म्हणत, 'मला जे शब्दांनी काव्यरुपानं मांडता आलं नाही ते अव्यक्त स्वरुप मी चित्रकलेद्वारे प्रगट केलं. म्हणजे जेथे शब्द संपले तेथे मला कुंचला हाती घ्यावा लागला'.

केवढी जबरदस्त ताकद आहे या विषयात पहा. चित्रकला हा विषय नसून तो साहित्याचा विभागच आहे. चित्रकलेसाठी उपजत ज्ञान लागतं हे म्हणणं चूक इतर सर्वसामान्य ज्ञानाप्रमाणंच तो शालेय विषय असून सरावानं त्यात कौशल्य साधता येतं. चित्रविषयाचं शिक्षण व्यक्तिमत्वाच्या विकासाला मदत करतं. ते प्रत्येक मुलाच्या अंगी असलेल्या सुप्त निर्माणक्षम दर्शनाची जोपासना करतं. हेच पहा कुठल्याही नवीन कल्पनेचा उदय एखादा कलाकार, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ यांच्या रेखाचित्रातूनच होत असतो. मोठे धरण असो की इमारत, नवीन प्रकारचं वाहन असो किंवा उपकरण या वास्तू व वस्तू प्रत्यक्षात उतरण्यापूर्वी त्याचं चित्रण करावं लागतं. मग त्यावरुन पक्की ड्रॉइंग्ज तयार होतात व शेवटी ती वास्तू, वस्तू प्रत्यक्षात आकार घेते.

अगदी लहान मूलही रेघोट्या गिरगिटत असताना त्यातून पोपट, काऊ, चिऊ, आई, बाबा, घर शोधायचा प्रयत्न करतं. येथे चित्रकलेशी आपला संबंध येतो तो संपूर्ण आयुष्याभर आपला पाठपुरावा करतो. पाठ्यापुस्तकं, गोष्टींची पुस्तकं, मासिकं, वर्तमानपत्रं या सगळ्या ठिकाणी चित्रकलेचा प्रभावी उपयोग करुन घेतला जातो. पानभर लिहून जे समजणार नाही ते कुंचल्याच्या काही फटकाऱ्यातूच समजते. त्यामुळे व्यंगचित्र हे नियतकालिकांचं अविभाज्य अंग बनलं आहे.

अशा या चित्रकलेला बालपणीच खतपाणी घालायला हवं. त्याचा पाया पक्का करायला हवा. चित्र काढत असताना मुलं नुसतीच रेघोट्या मारुन रंग भरत नसतात. त्यांच 'घडण' ही त्याच वेळी चालू असतं. त्यामुळे पुढील आयुष्यातील कित्येक अभ्यासक्रमात, व्यवसायात काम सुलभ होते. कित्येक विद्यार्थी व पालकांना चित्रकलेचं महत्त्व वाटत नाही. खरे तर डॉक्टर, इंजिनीअर्सना चित्रकलेशिवाय पर्याय नसतो. मानवी

शरीराची रचना असो व एखाद्या यंत्राची रचना असो, चित्राद्वारे ती समर्थपणे समजावून सांगता येते. याबाबत १५ व्या शतकातील लिओनार्दो-दा-विंचीचंच उदाहरण पाहू. तो ओळखला जातो तो मोनालिसाच्या हास्यामुळे. पण त्याचं वैद्यक शास्त्रातील योगदान अचंबित करतं. हे योगदान किती जणांना माहिती आहे? चित्रकला ही त्यसाठी केवळ एक कला नव्हती, तर शास्त्रीय संकल्पना होती. स्वत: शरीर विच्छेदन करुन आपल्या कलेच्या माध्यमातून त्यानं शरीर रचनेची रेखाटनं केली. नीला, रोहिणी, धमन्या, नसा यांची मांडणी चित्रातून सजीव केली. मानवी कवटी, मेंदू त्यातील संज्ञाची केंद्रस्थान यांची त्यानं अनेक रेखाटनं केली व चित्रकार आपल्या कलेचा उपयोग इतर विद्याशाखेच्या अभ्यासाशी कसा परिणामकारक रीतीनं करु शकतो याचा जणु पाठच दिला.

हे झालं १५ व्या शतकातलं. पण आजच्या या २१ व्या शतकातही कलेचं महत्त्व जाणणारे डॉक्टर आहेत. ठाण्यातील प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. इंगळहळ्ळीकर यांची मुलाखत वाचली. ते म्हणतात वडील चित्रकार असल्यामुळे चित्रकलेचे संस्कार माझ्यावर झाले. माझी सौंदर्यदृष्टी चित्रकलेमुळेच वृद्धींगत झाली. ठाण्यातीलच एक्स-रे स्पेशालिस्ट डॉ. सुधीर पटवर्धन हेही उत्तम चित्रकार आहेत. यावरुन आपल्या लक्षात आलेच असेल की, डॉक्टर, इंजिनीअरींग शाखेकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशेपासून या विषयाकडे लक्ष द्यायला हवं. फावल्या वेळेचा उपयोग म्हणूनही चित्रकला कामी येतं. अनेक उद्योगपती, व्यावसायिक डॉक्टर्स, तंत्रज्ञ आपल्या फावल्या वेळेचा उपयोग चित्र काढण्यासाठी करतात हे वरील उदाहरणांवरुन लक्षात येईलच. विन्स्टन चर्चिलानाही चित्रकलेचा मोह पडला. त्यांनी कौशल्य आत्मसात केलं. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी मनावरील ताण हलका करण्यासाठी ते चित्र काढत. Change of work is rest ही उक्ती येथे लागू पडते.

रूढार्थानं पालन करतो तो पालक व शिक्षण देतो तो शिक्षक या दोन्हींमधील 'क' हा कलेचा कारण मुलांचं संगोपन आणि शिक्षण यांची कला ज्याला अवगत झाली तेच खरे पालक आणि शिक्षक. कलेतून माणूस घडवा. 'अकलेतून यांत्रिक माणूस नको. या कळ्यांना या फुलांना रंग द्या अन् गंध द्या. पाकळ्यांना या कळ्यांना साद द्या, प्रतिसाद द्या.

**मंजिरी दांडेकर**
मधु-मिलिंद बिल्डिंग, घंटाळी रोड
नौपाडा, ठाणे (प) ४००६०१.
दूरध्वनी क्रमांक : २५४१ ४५३१

## सुभाषित

***यथा धेनुसहस्त्रेषु***
***वत्सो विंदति मातरम तथा***
***पूर्वकृतं कर्म***
***कर्तारमनुगच्छति***

ज्या प्रमाणे हजारो गायीमधून पाडस स्वत:च्या आईलाच हुडकून काढते त्याप्रमाणे मागील जन्मी केलेले कर्म करणाराच्याच मागे जाते.

# युगाचा मंत्र

*आमच्या डॉ.वा.ना.बेडेकर संशोधन व व्यवस्थापन संस्थेच्या विद्यार्थ्यांशी बोलण्यासाठी नारायणमूर्ती मे महिन्यात आले होते. नारायणमूर्ती सारखी प्रसिद्ध व्यक्ती आल्यामुळे माध्यमांतून त्याविषयीची माहिती मोठ्या प्रमाणात आली. नारायणमूर्तींच्या विचारांचे शब्दांकन करणारे भाषांतर सकाळ चे श्री. प्रशांत दीक्षित यांनी २८ मे च्या सप्तरंग पुरवणीत दिली. प्रशांत दीक्षित हे आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांचे हे शब्दांकन 'सकाळ' च्या सौजन्याने दिशाच्या वाचकांसाठी देत आहोत. - संपादक*

या देशातील तीन गोष्टींचा मला अभिमान आहे. १) भारतातील लोकशाही. ही लोकशाही फार कार्यक्षम नसली तरी विलक्षण जिवंत आहे. जनतेचा तो आवाज आहे आणि या लोकशाहीने देशात काही अत्यंत परिणामकारक बदल घडवून आणले आहेत. २) धर्मनिरपेक्षता ही दुसरी महत्त्वाची बाब. या तत्त्वाला तडे जाणाऱ्या काही घटना घडल्या तरी देश धर्मनिरपेक्षतेशी बांधील आहे. धर्मनिरपेक्षता यशस्वी झालीच पाहिजे. कारण सर्व जातिधर्मातील लोकांनी सुसंवादाने काम करणे हे आजच्या जगात अतिशय आवश्यक आहे. ३) तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे, या देशातील तरुण. मी जगातील अनेक मान्यवर विद्यापीठांतून फिरलो आहे. प्रगत देशांतील ज्येष्ठ व मध्यमवयीन नागरिक आणि भारतातील त्याच वयोगटातील नागरिक यांच्या दृष्टिकोनात मला फरक दिसतो. आपल्या देशातील ज्येष्ठ व मध्यमवयीन नागरिक हे बरेचसे पराभूत मनोवृत्तीचे, स्पर्धेचे भय बाळगणारे व रूढीप्रिय असतात. पण जेव्हा मी भारतातील तरुणांची अन्य देशांतील तरुणांशी तुलना करतो तेव्हा मला दोघांमध्ये काहीच फरक दिसत नाही. तेव्हा भारताला जर काही भवितव्य असेल तर ते तरुणांचा उत्साह, तरुणांमधील सळसळती ऊर्जा यातून घडणार आहे. गेल्या आठवड्यात देशातील काही घडामोडींबद्दल ज्येष्ठ नागरिक बोलायला कचरत होते, तेव्हा त्यांना जे योग्य वाटते ते स्पष्टपणे मांडण्यासाठी तरुणच पुढे सरसावले.

मनमोहनसिंग यांनी आर्थिक क्षेत्रातील सुधारणांना सुरवात केल्यापासून भारताचा विकासाचा वेग गेली काही वर्षे सहा टक्क्यांवर राहिला आहे आणि आता तर आपण आठ टक्क्यांपर्यंत आलो आहोत. आपल्या ''जीडीपी'' च्या ७८ टक्के भाग खासगी क्षेत्रातून येतो आणि शेवटी खासगी क्षेत्रच देशाला प्रगतिपथावर नेणार आहे. जागतिकीकरणाची मानसिकता आपण आत्मसात करीत आहोत व कल्पक उत्पादनांनाही चालना देत आहोत. स्वस्त संगणक किंवा एक लाख रुपयांत मोटारगाडी निर्माण करणारे प्रकल्प उभे राहत आहेत. सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किमतीत दर्जेदार उत्पादन करण्याचे तंत्र आपण शिकत आहोत, हेच यातून दिसते. जागतिक बाजारपेठेत टिकायचे असेल तर अत्यंत कमी वेळात, माफक किमतीत जागतिक दर्जाचे उत्पादन निर्माण करण्याचे आव्हान आपण स्वीकारलेच पाहिजे.

तरीही जगाच्या बाजारपेठेत आपला हिस्सा अवघा एक टक्के इतकाच आहे. प्रत्येक व्यक्तीमागे ८० डॉलरची निर्यात आपण करतो, तर चीन व्यक्तीमागे ८०० डॉलरची निर्यात करतो. निर्यात वाढणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. गरिबी हटविण्यासाठी रोजगारनिर्मिती हवी, त्याचबरोबर उत्पादने व सेवा यांची विक्री झाली पाहिजे आणि नागरिकांच्या हातात खर्च करण्यासाठी पैसा आला पाहिजे. पैसा खर्च करण्याची क्षमता असणाऱ्या नागरिकांची संख्या भारतात फार कमी आहे निर्यातीतून ती वाढू शकते. चीन,

जपान व दक्षिण आशियातील देशांनी हाच मार्ग अवलंबिला. चीनने गेल्या १२ वर्षांत १५६ दशलक्ष रोजगार निर्माण केले. म्हणून विविध देशांत काम करुन निर्यात वाढविणाऱ्या ''भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्या'' निर्माण करणे हे मुख्य आव्हान आपल्यासमोर आहे.

त्यासाठी काय करावे? पहिली गोष्ट म्हणजे आत्मविश्वास कमवा. पारतंत्र्यातून आलेला दुबळेपणा, भिडस्तपणा टाकून द्या. पूर्वी आपल्यावर राज्य करणाऱ्यांबरोबर वाटाघाटी करण्याचा, त्यांना आपला माल विकण्याचा आणि प्रसंगी कठोर निर्णय घेण्याचा आत्मविश्वास अंगात मुरवा. जी-७ सारखी श्रीमंत राष्ट्रे व चीन हेच आपले मार्केट आहे. ते मिळविण्यासाठी आत्मविश्वास, कठोर निर्णय घेऊन ते राबविण्याची तडफ हे गुण कामाला येतात.

''प्रोॲक्टिव्हिटी'' आपण विकसित केली पाहिजे. भारतीय माणसे ही बहुधा ''रिॲक्टिव्ह'', म्हणजे प्रतिक्रियावादी असतात. आपण स्वत:हून पुढाकार घेत नाहीत. रूढीग्रस्ततेचाही तो परिणाम असेल. माझे परदेशी मित्र मला नेहमी सांगतात, की तुम्ही भारतीय नेमून दिलेले काम करून देण्यात फार हुशार असता. पण स्वत: पुढे येऊन नवा प्रस्ताव देणे किंवा नवा दृष्टिकोन मांडून त्यानुसार कार्यवाहीची रूपरेषा सुचविणे याबाबत तुम्ही फार कमी पडता. ही मानसिकता आपण बदलली पाहिजे आणि मार्केटमधील समस्यांची फेरमांडणी करण्यात आपण पुढाकार घेतला पाहिजे.

गुणवत्ता व दर्जाशी तडजोड होताच कामा नये. जागतिक बाजारपेठेत शॉर्टकटला वाव नाही. गुणवत्तेचाच आग्रह धरा. त्यासाठी सतत शिकत राहण्याची वृत्ती जागती ठेवा. नव्या कल्पनांसाठी स्वागतशील रहा. उत्तमोत्तम कल्पनांचा शोध घ्या. त्या आत्मसात करा किंवा त्या अधिक उपयुक्त करा. गती हा या युगाचा मंत्र आहे. हेच काम कालच्यापेक्षा अधिक गतीने मी करू शकतो का हा प्रश्न सतत स्वत:ला विचारीत राहा.

उत्पादनाबाबतही असाच प्रश्न सातत्याने विचारा. कालच्यापेक्षा आज मार्केटमध्ये मी कोणती नवी कल्पना आणीत आहे. असा ध्यास लागला पाहिजे. नावीन्याला जागतिक बाजारपेठेत खूप महत्त्व आहे. पण नावीन्यपूर्ण कल्पना सर्वोत्तम पद्धतीने अमलात आणणे जास्त महत्त्वाचे. कार्यक्षम अंमलबजावणी नसेल तर नावीन्याला किंमत नाही. बाजारात येणाऱ्या नवीन तंत्रज्ञानाची फक्त माहिती नको ते आत्मसात केले पाहिजे. हुशार माणसे याकडे बऱ्याचदा दुर्लक्ष करण्याची चूक करतात. टेक्नॉलॉजी सेव्ही असलेच पाहिजे. त्याचबरोबर बहुविध संस्कृतीच्या सहकाऱ्यांशी जुळवून घेण्याची, त्यांच्यासमवेत सहजतेने काम करण्याचे कौशल्यही आत्मसात करावे लागते. बहुराष्ट्रीय कंपनीत विविध देशांतील लोक आपल्याबरोबर आपली संस्कृती घेऊन येतात. त्यांच्या आचारविचारांशी संवाद साधता आला पाहिजे.

व्यवसायातील संभाव्य धोक्यांसाठी पूर्वतयारी करण्यात आपण भारतीय फार कमी पडतो. एकच तंत्रज्ञान, ठराविक ग्राहक, ठराविक कर्मचारी यांच्यावर विसंबून राहून चालत नाही. व्यवसायातील धोके लक्षात घेऊन त्यांना तोंड देण्याचा आराखडा अद्ययावत ठेवावा लागतो.

सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे आपला ''ब्रॅण्ड'' बाजारात ठसविणे. ''ब्रॅण्ड बिल्डिंग'' वर सतत लक्ष केंद्रित केले पाहिजे. ''ब्रॅण्ड'' म्हणजे कंपनीचा ग्राहकांवर आणि ग्राहकांचा कंपनीवरील विश्वास. सोनी, मायक्रोसॉफ्ट, युनोलिव्हर हे जबरदस्त ब्रॅण्ड आहेत. भारतात असे जागतिक ब्रॅण्ड निर्माण झाले पाहिजेत. यासाठी उत्पादनाच्या किमतीपेक्षा मूल्याकडे ग्राहकाचे लक्ष वेधले पाहिजे. किमतीचा ध्यास धरून तुम्ही आघाडी घेऊ शकत नाही.

पृष्ठ क्र. ३१वर

# वेध माहितीच्या उत्क्रांतीचा व विनियोगाचा

*ग्रंथालयशास्त्र निष्णात परीक्षेचा एक भाग म्हणून निबंध लिहिण्याची यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची अट आहे. वाशी येथील 'कर्मवीर भाऊराव पाटील' महाविद्यालयाच्या केंद्रातील विद्यार्थीनी श्रीमती स्वप्ना वर्तक यांनी अभ्यास शिबीरासाठी लिहिलेला शोधनिबंध येथे देत आहोत. 'दिशा'त शोधनिबंध आल्याने त्यांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळणे हा हेतू आहे. 'दिशा'चे कार्यकारी संपादक प्रा. मोहन पाठक हे त्यांचे मार्गदर्शक होते. (२००५-२००६ या वर्षात) - संपादक*

**उत्तरार्ध**

**१. Information Technology (IT) :-**

यात CD- Rom, Disk, DBMS Pakage, Online Access, Electronic Document. Computer या सर्वांशी संबंधित तंत्रज्ञान विकसित झाले आहे.

**२. Management Information System :-**

यात देखील संगणकाचा वापर हा फार मोठ्या प्रमाणावर केला जातो. यात व्यवस्थापनाबरोबर दुय्यम स्वरुपाची माहिती डेटा प्रमाणे अचूक दिली जाते. संबंधित वेळेनुसार माहिती दिली जाते. ह्या माहिती देण्याच्या पद्धतीमुळे गरजेनुसार निर्णय घेतले जातात. यात Various Systems याचा वापर केला जातो. यामुळे योजन व निर्णय हे स्थळ, काळानुसार अचूक घेतले जातात. यामुळे यात धोका संभवत नाही. यात भाषा, साधी, सरळ व सोपी वापरली जाते. MIS चे घटक Hardware, Software, Database आणि Models Designe हे आहेत. ह्या संगणकीकरणामुळे अंतर्गत व बाह्य स्वरुपाची माहिती ही संस्थेला एकत्रितरित्या दिली जाते.

**3. Information System (Information Handling) :-**

Information System and Physical system या दोन्ही MIS मध्ये येतात. यात माहिती ठेवण्याची पद्धत ही Webstere's Unabridged Dictionary या प्रमाणे ठेवावी लागते. ही माहिती पुन्हा मिळवता आली पाहिजे यासाठी ती Physical Business System प्रमाणे ठेवावी लागते.

Input → Processing →Output

<u>Feed Back</u>

संस्थेची माहिती, धंद्याचे कार्य Data ची गरज, Data स्रोत, मूल्यांकन, Organisational Structure, Control मॅकेनिझम यालाच "Information System" म्हणतात.

**4. Information Resource Management (IRM) :-**

IRM म्हणजे व्यवस्थापन तंत्राचे नियोजन, विश्लेषण नियंत्रण इ. माहितीचे स्रोत हे माणूस, सामान, मशीन व पैसे हे होत. माहिती ही Gathered, Stored, Processed, generated and retrived करताना बाजारात किंमत द्यावी लागते. आणि काळजीपूर्वक हाताळणी करावी लागते. ह्या सर्वांवरुन असे लक्षात येते की, माहिती क्षेत्रात अर्थशास्त्र आले आहे. Information Retrival System (IRS) ही संकल्पना म्हणजे संस्थेतील कागद पत्रांचे व्यवस्थापन Physical Space, Technologies, लोक, माहिती ही होय.

**5. Strategic Information Managements (SIM) :-**

Strategic हा शब्द Management Science मधून आलेला आहे. Strategic Management परिणामकारक संघटना आहे. Strategic मध्ये सगळी व्यवस्थापनाची कार्ये येतात. ती पुढील प्रमाणे नियोजित, आकृतिबंध, Control, Marketing, reporting, Finance, Production, evaluation. इ. सर्व साधारणपणे Strategic Resources हे सर्व संस्थांत आढळतात. Strategic Information Management चा उद्देश माहितीचे व्यवस्थापन करणे हा आहे. माहिती व्यवस्थापनाचे मशीन हे Starategy आहे.

**6. Information Processing :-**

माहिती प्रक्रिया म्हणजे Data Modified करुन उपयोग करण्यासाठी उपलब्ध करणे ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. आपल्याला पावलोपावली refinement data ची गरज भासते. माहितीवर पायरीपायरीने प्रक्रिया करुन refine data मिळतो. या उत्पादनालाच "माहिती प्रक्रिया" असे म्हणतात. माहितीची प्रक्रिया करत असताना data वर प्रक्रिया करुन Output मिळतो. ही प्रक्रिया Assumption, Principles आणि ज्ञान ह्या विशिष्ट क्षेत्रात करावी लागते. मानव ही प्रक्रिया करताना Logic, Intelligience, अनुभव आणि ज्ञान ह्या आधारे करतो पण हीच प्रक्रिया आता Computer Programs, Software तयार करुन केली जाते.

**2.2.1. Infomation Environment :-**

माहितीचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक असे वातावरण असावयास हवे कारण कमी संस्था माहितीचे व्यवस्थापन करण्यास यशस्वी (Successful) झाल्या आहेत काही संस्था माहितीचे व्यवस्थापन करण्यासाठी गुणात्मक दर्जा (qualities) तयार करतात. हा गुणधर्म Information Enviroment चा असतो.

**2.2.2. Role of the Information Environment :-**

माहितीच्या व्यवस्थापनात तयार करुन ती माहिती सर्वांना द्यावयाची अथवा नाही हा संस्थेचा स्वत:चा प्रश्नच असतो. माहितीचे व्यवस्थापन हे वाहत आहे.

कोणत्याही संस्थेची योजना हा संस्थेचा दृष्टिकोण असतो. उत्पादनासाठी काळजीपूर्वक अभ्यास करणे गरजेचे आहे. उपलब्ध असलेल्या माहितीतून Market Demand, Technical Capacity and aspirations याचा अंदाज घेतला जातो. माहितीच्या व्यवस्थापनात Information Environment चा holistic दृष्टिकोण असतो. राजकीय, समाज, उत्पादने, बाजारपेठा आणि Environment हे घटक माहिती व्यवस्थापनावर परिणामकारक ठरतात. माहिती व्यवस्थापन करताना, काही अडथळे आले तरी यातून मार्ग निघतात. माहितीच्या व्यवस्थापनावर माणसाच्या वर्तुणुकीचा प्रत्यक्ष परिणाम होतो. प्रचलित घडामोडी ह्या Information Environment मधून वाचकापर्यंत पोचतात. ही संघटित करुन ठेवणे फार महत्त्वाचे आहे. Information Environment ही संकल्पना समजून घेणे गरजेचे आहे. कारण; त्याचा परिणाम हा माहितीच्या व्यवस्थापनावर होतो.[१२]

**२.३ माहितीच्या व्यवस्थापनातील टप्पे :-**

माहितीच्या व्यवस्थापनातील टप्पे हे खालील प्रमाणे आहेत.

१) एकत्रीकरण २) संघटन ३) पुनर्संघटन ४) विपणन

---

तळटीप : - १२. Kamal Vijayan ; knowledge and Information Management, Delhi. 1st ed ; Macmillal, 2004.

२.३.१. एकत्रीकरण :-

माहितीचे एकत्रीकरण करताना माहिती साठविण्याचे बाह्यस्वरुप बदलून ज्यात जास्तीत माहिती कशी साठविली जाईल याकडे कल असतो. माहितीचे एकत्रीकरण म्हणजे विश्लेषण व रचना ह्या दोन गोष्टी आहेत. माहिती विशिष्ट क्रमानुसार लावून त्या माहितीवर प्रक्रिया करुन ही माहिती पुन्हा लिहिली जाते.

२.३.१.१. विश्लेषण :-

परीक्षेच्या दृष्टीने सखोल विचार केल्यास माहितीच्या प्रक्रियेचा संदर्भ 'विश्लेषण' या शब्दाशी लागतो. इतर अभ्यासाशी किंवा स्वतंत्र मूळ घटकाशी एकत्र केलेल्या घटकाचे स्वरुप समजून घेणे हे वैशिष्ट्य सांगता येईल. माहिती व विश्लेषण हे दोन घटक एक नाहीत. एखाद्या लेखाचे निर्देशन करणे म्हणजे विषय विश्लेषण करणे होय. माहितीच्या विश्लेषण केंद्रातून चिकित्सात्मक मूल्यांकनाचा संदर्भ दिला जातो. कमीत कमी माहितीचे एकत्रीकरण केले तर ते विश्लेषण ठरत नाही. एकत्रीकरण झालेल्या माहितीचे उत्पादन तयार होते. ते उत्पादन सर्वांसाठी उपयुक्त असते. निर्देशन, सारांश आणि इतर कार्यात आणि माहितीच्या एकत्रिकरणात फरक आहे.

२.३.१.२. रचना :-

माहितीची रचना करताना ती विषयावर विभागणी करुन केली जाते. विषयाप्रमाणे माहिती प्रथम विभागातून त्यानंतर प्रत्येक टप्प्यानुसार ठेवली जाते, जेणेकरुन, या माहितीला निबंधाचे स्वरुप हे प्राप्त झाले पाहिजे. हे निबंध त्या त्या विषयात अनुवर्णानुसार, विषयानुसार लावले जातात व मोठे विषय देखील अनुवर्णानुसार लावतात म्हणजे थोडक्यात माहितीची रचना ही शब्दकोशानुसार करावी लागते. अशा प्रकारे जर ही रचना केली असेल तर वाचकांना हाताळण्यास सोपे जाते. व माहितीही पटकन मिळते.[१३]

२.३.२. संघटन :-

माहिती संघटन केल्यामुळेच माहिती एकत्रित येते. माहिती इतरत्र उपलब्ध असते. ती एकत्रित करुन एखाद्या संस्थेचा डेटा बेस हा तयार होतो. संस्थांच्या कार्यालयांमध्ये कागदपत्र दस्तऐवज हे उपलब्ध असतात. तेथे काम करणारे कर्मचारी इलेक्ट्रॉनिक/चुंबकीय माध्यम वापरुन व त्यांच्या अनुभवाचा उपयोग करुन ही माहिती साठवतात.

ती माहिती गरजेनुसार संघटन करुन पुन्हा पुन्हा वापरली जाते. संस्थेच्या गरजा या बाह्य स्वरुपी वाढल्यामुळे माहितीचे संघटन करता हे फार महत्त्वाचे आहे. संस्थेत Manuals, Strandards, Patentes, Annual Reports, Trade literature ही माहिती संघटन करणे फार गरजेचे आहे. खालील मार्गांनी ही माहिती संस्थेच्या कार्यालयात येत असते. 1) Market 2) Products 3) People (Customers Wholesalers, Retailer Staff) 4) Technologies 5) Pattern 6) Designs 7) Trademarks 8) Organisations 9) Database 10) Documents 11) Policies 15) Specification 16) Judgement 17) Context (Social, Legal, Political, Economics, National, International etc.) Comments, reflections and observations, Anticipation of commperation, problems Brain storming.

२.३.२.१. Information Warehouse :-

संस्थेत माहिती ही वेगवेगळ्या मार्गांनी येत असते. ती माहिती साठविण्याची गरज त्या संस्थेला असते. काही माहिती ठराविक काळानंतर शोधली तरी सापडत नाही. त्यासाठी फार कष्ट करावे लागतात म्हणून खालील मार्गाने येणारी माहिती साठविणे गरजेचे असते.

1) documents 2) speeches 3) pictures

---

तळटीप : - १३. Chatterjee, Amitabha : Information Analysis Consolidation and Repakaging, Dept. of Librarary and Information Science, JadhavaPur University., Calcutta.

4) images 5) e-mails 6) correspondences 7) world wide web etc. अशा प्रकारचे बाह्यस्रोत हे फार व्यापक व उत्तम प्रकारची माहिती देतात.

२.३.२.२. Management Information Systems (MIS) :-

MIS मध्ये staff, products, सेवा, prices and customers यांना सामावून घेतले जाते.

ही सर्व माहिती महत्त्वाची व वेळोवेळी उपयोगी पडणारी असते अशा माहितीची साठवण करुन data base तयार केला असता. तिला "data warehouse" म्हणतात.

data warehouse हा ऐतहासिक असतो. त्याच्यावर योग्य प्रक्रिया करुन Keyword, clues देवून ही माहिती वेळोवेळी वापरली जाते. या माहितीला ''ऐतहासिक माहिती'' म्हणतात.

२.३.२.३. Information Mining :-

Information Mining हे माहिती साठविण्याचे तंत्र आहे. Data Mining ह्या तंत्रज्ञानात माहिती टाकावू असेल तर तिच्यावर प्रक्रिया करुन ती वापरता कशी येईल व त्या पासून ज्ञान कसे उपलब्ध होईल याचा विचार केला जातो. Data Mining आणि Data Warehouse ह्या संकल्पना Credit Card, Retail, Sales, Telemarketing, direct Marketing, Transactions इ. या सारख्या आहेत. Information Mining, Financial Services, Banks airlines, Manufacturing and Insurance sector. इथे पाहावयास मिळतात.[१४]

२.३.३. पुर्नसंघटन :-

संघटनाची प्रक्रिया म्हणजे बाह्यस्वरुपाने काही घटकांची रचना बदलणे आणि ते घटक निबंधाच्या स्वरुपात वापरायला देणे. माहितीचे संघटन करताना मशीनच्या स्वरुपात रचना, सादरीकरण करताना माहितीचे सादरीकरणाचे माध्यम हे ठरविलेले असते. माहितीच्या एकत्रीकरणात खालील दोन गोष्टी येतात.

२.३.३.१ संघटनाचे माध्यम :-

माहितीचे बाह्यस्वरुप हे अशा प्रकारचे पाहिजे की त्या पासून वाचकांना माहिती सहजरित्या मिळायला हवी. उदा:- मुद्रित स्वरुप, ऑडिओ व्हिज्युअल स्वरुप इ.

२.३.३.२ संघटनाचा ढाचा :-

माहितीची रचना आकार यावर माहितीचे स्वरुप अवलंबून असते. माहितीचे पुर्नसंघटन करणे म्हणजे बाह्यस्वरुपात बदल करणे किंवा काही विषय परत परत हाताळता येतील, अशा प्रकारे संघटन करणे.

नेहमी योग्य माहिती, योग्य वेळी, योग्य किंमतीत आणि योग्य वाचकांच्या हातात द्यायला हवी. काही शब्दांत सहज उपलब्ध होणारी माहिती ही उपयोगाची नसते. कारण ह्या माहितीत जे घटक असतात. ते वाचकांच्या उपयोगाचे नसतात. माहितीचे एकत्रीकरण म्हणजे एखाद्या अडचणींवर मात करणे.

२.३.४ विपणन :-

माहितीच्या एकत्रीकरणाचे काम हे माहितीच्या एकत्रीकरणाचे उत्पादन असते. दुय्यम तृतीय माहितीचे स्रोत म्हणजे माहितीच्या एकत्रीकरणाचे उत्पादन होय. विश्लेषण एकत्रीकरण व पुनर्संघटन माहितीच्या एकत्रीकरणाचे प्राथमिक स्रोत आहेत.

२.३.४.१ माहितीच्या एकत्रीकरणाची उत्पादने :-

माहितीच्या एकत्रीकरणाची उत्पादने खालील

तळटीप : - १४. Kamal Vijayan : knowledge and Information Management, Delhi. 1st ed.: Macmillal, 2004.

प्रमाणे आहेत. १) रिपोर्ट २) विश्लेषणात्मक रिपोर्ट ३) टेक्निकल रिपोर्ट ४) नियतकालिकांचे निर्देशन ५) सारांश ६) नियतकालिके ७) Handbooks/Manuals ८) पेटंट ९) कॉपीराईट ही उत्पादने खूप मेहनत करुन संस्था किंवा काही गट, माणसांचे किंवा एकटा माणूस ही तयार करतो. अशा माहितीवर मालकी हक्क ही सांगता येतो. कारण माहिती ही माहितीच्या गरजेपोटी विकली जाऊ लागली आहे. ही माहिती वस्तुनिष्ठ नसली तरी माहितीच्या मोबदल्यात पैसे घेतले जातात. अशाच प्रकारची माहिती अनेक ठिकाणी वापरली जाते व अशी माहिती मिळविण्यासाठी माहितीचा क्रयविक्रय केला जातो. त्यासाठी ह्या उत्पादनांची झेरॉक्स, ई-मेल, इंटरनेटवर, वेबसाईटवर ही माहिती ठेवली जाते. ही माहिती ॲक्सेस करण्यासाठी पासवर्ड दिले जातात. ही माहिती घेण्यासाठी योग्य मोबदला दिल्यावर घेता येते.

**२.३.४.२. माहितीच्या एकत्रिकरणाची उत्पादने वापरणारा गट :-**

माहितीच्या एकत्रीकरणाची उत्पादने वाचकांना गरज लागेल त्याप्रमाणे वापरली जातात. ही माहिती वापरणाऱ्या उपभोक्त्यांचे गट तीन प्रकारचे आहेत.

**१. संशोधक :**

ह्या गटात संशोधक, इंजिनिअर्स, टेक्नॉलॉजिस्ट, प्राध्यापक येतात. त्याचप्रमाणे, कारखान्यांतील लोकांना खालीलप्रमाणे माहितीच्या एकत्रीकरणाची उत्पादने हवी असतात.

१) संशोधनासाठी उपयुक्त माहिती, टेक्निकल माहिती
२) शिकणारे, संशोधन करणारे, टेक्निकल काम करणारे
३) प्रायोगिक माहिती

**२. योजना करणारे**

यात मॅनेजर, कारखानदार, कारखान्यात काम करणारे लोक यांना खालील प्रमाणे माहिती लागते.

१) भविष्यकालीन योजना २) निर्णयात्मक भूमिका
३) प्रकल्पाच्या योजना ४) पैशाची योजना

**३. माहितीशास्त्रात काम करणारे :-**

या गटात माहिती शास्त्रात काम करणारे ग्रंथपाल, टेक्निकल, कामगार इ. ज्यांना माहितीची गरज लागते असे लोक.

**४. समाज :-**

यात समाजातील वेगवेगळ्या थरातील लोक हे येतात यांना ही माहिती खूप गरजेची असते. ही माहिती योग्य त्या किंमतीला समाजात विकली जाते व विकत घेतली जाते. ती वस्तुनिष्ठ नसली तर वस्तू प्रमाणे विकली जाते. ह्या वस्तूची म्हणजे माहितीची किंमत म्हणजे त्या व्यक्तीचा मालकी हक्क जे सांगतात. त्यांच्या कामाचा तो मोबदला असतो. [१५]

**३. माहितीचे एकत्रीकरण :-**

**३.१ माहिती एकत्रीकरणाच्या व्याख्या :-**

माहितीच्या व्यवस्थापनातून निर्णय घेणे, सामाजिक प्रश्न सोडविणे, माहितीचे विश्लेषण करुन ज्ञानात रुपांतर करणे ही कामे केली जातात. ह्या कामांना ''माहितीचे एकत्रीकरण'' म्हणतात. तसेच ती माहिती लोकांच्या उपयोगासाठी संग्रहीत करुन ठेवली जाते. सारसेविक आणि वुड यांची माहिती एकत्रीकरणासाठी व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

''तात्काळ निर्णय घेणे शक्य व्हावे, वा विशिष्ट सोडवणूक करणे शक्य व्हावे, यासाठी सार्वजनिक ज्ञानसंग्रहातून विशिष्ट विषयांवरील माहितीची निवड,

तळटीप : - १५. Chatterjee, Amitabha : Information Analysis Consolidation and Repakaging, Dept. of Librarary and Information Science, JadhavaPur University., Calcutta.

विश्लेषण आणि पुनर्संघटन करणे म्हणजे माहितीचे एकत्रीकरण''

श्रीलंकेत युनेस्कोच्या सहकार्याने आयोजित केलेल्या Symposium on Information Analysis and Consolidtion मध्ये माहिती एकत्रिकरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

''उपभोक्त्यांच्या विशिष्ट समूहास विश्वसनीय आणि संक्षिप्त स्वरुपात ज्ञान उपलब्ध करण्यासाठी संबंधित विषयावरील विविध प्रलेखातील माहितीचे मूल्यमापन करुन संक्षिप्त स्वरुपात एकत्रीकरण करणे म्हणजे माहितीचे एकत्रीकरण होय.''[१६]

### ३.२ प्रक्रिया व महत्त्व :-

माहितीचे एकत्रीकरण व पुनर्संघटन या परस्परांशी संबंधित प्रक्रिया आहेत. माहिती एकत्रीकरण प्रक्रियेद्वारे विशिष्ट विषयावरील विविध ठिकाणाच्या माहितीचे मूल्यमापन करुन संक्षिप्त स्वरुपात एकत्रीकरण केले जाते.

ग्रंथपालांसाठी माहितीचे विश्लेषण आणि एकत्रीकरण हे काही नवीन नाही. वाचकांच्या गरजेनुसार माहिती एकत्रीत करुन त्याचे विश्लेषण केले पण ग्रंथालयांची संकल्पना बदलल्यामुळे ग्रंथपाल ज्ञानाचा साठा करुन ग्रंथालय म्हणजेच माहिती सेवा केंद्रावरुन ते सेवा देवू लागले. गेल्या शतकापासूनचे ग्रंथपाल माहितीचे एकत्रीकरण व संकलन करुन ठेवत होते. उदा:- केरटेन याने १९व्या शतकात संशोधनकांचा एकत्र बोलावून त्याने त्यांच्यापुढे एक आव्हान दिले ते असे की, ''काही विशिष्ट क्रमाने वाढणारी कच्च्या स्वरुपाची माहिती मिळवणे तसेच संशोधकांकडून सहज उपलब्ध होणारे प्रयोगात्मक निष्कर्ष एकत्र करणे.'' याच आव्हानातून तयार होणाऱ्या उत्पादनाला 'हस्तपुस्तिका' असे म्हणता येईल. त्याचप्रमाणे त्या पुस्तिकेत असलेली माहिती विशिष्ट क्रमाने मांडली गेली त्याच माहितीला 'माहिती संकलन' म्हणतात. माहितीचे विश्लेषण व पुनर्संघटन या दोन गोष्टी माहिती एकत्रीकरणात येतात. माहिती एकत्रीकरणाचे उद्देश माहिती पसरविणे, तिच्यात वाढ करणे व ती वापरणे होय.

### ३.२.१ माहितीच्या एकत्रीकरणाचे मूल्यांकन :-

माहितीचा समतोल राखण्यासाठी माहितीच्या एकत्रीकरणाचे मूल्यांकन करणे गरजेचे आहे. माहितीचा वापर करणारे वाचक आणि राजकीय लोक ह्या माहितीच्या आधारे मोठे मोठे निर्णय घेतात. वेगवेगळ्या समस्यांवर ही माहिती उपयोगी पडते. माहिती ही नेहमी सत्य असावयास हवी नवीन शोध व प्रचलित घडामोडी यांचा समावेश यात असावयास हवा. विज्ञान तंत्रज्ञान, शरिरशास्त्र, व्यावसायिक शिक्षण आणि इतर क्षेत्रातील नवीन माहिती गोळा केली पाहिजे.

### ३.२.२ माहिती एकत्रीकरणाची प्रक्रिया :-

माहितीचे एकत्रीकरण करताना ही माहिती प्रथम ती सत्य आहे का? ते पडताळून पाहावे लागेल. त्यानंतर ती माहिती प्रथम कशात प्रकाशित झाली त्याचा शोध घेऊन पडताळून पाहावे लागेल. माहिती फार जुनी आहे, त्यानंतर आणखी माहिती तशीच प्रसिद्ध झाली आहे का ? ती माहिती आताची प्रचलित आहे का ? माहिती उपयुक्त आहे का ? ती दुर्मिळ आहे का ? या गोष्टी पाहून माहितीची निवड ही केली जाते. त्या नंतर माहितीवर पुढील प्रक्रिया करतात.

१. Acquistition :-

माहितीचे संघटन केल्यामुळेच माहिती एकत्रित येते. माहिती इतरत्र उपलब्ध असते. ती एकत्रित करुन एखाद्या

---

तळटिप :- १६. Saracevic, T. and wood, J.S.: Consuldation of Information : A Handbook of Evalution, Restructing and Repackaging of Scientific and Technical Information, Paris, UNESCO, 1981.

संस्थेचा Data Base तयार होतो व त्याचा वापर ती संस्था करीत असते.

२. मूल्यांकन :-

यात माहिती ही खरी, खोटी, सत्य आहेत का ? या माहितीचा उपयोग वाचकांना किती होणार ? याचा विचार केला जातो.

३. विश्लेषण :-

यात माहितीचे विश्लेषण करुन ती माहिती घेण्यास योग्य आहे का ? यात खरी माहिती आहे का ? यात घटक कोणते आहेत ? याचा विचार केला जातो.

३.३ माहितीचे एकत्रित स्वरुप :-

माहिती ही खूप मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत असते. ही माहिती प्रकाशित होताना लेखकाचे विचार, सामान्य माणसाचे विचार, भाषणे, लेख, पत्रव्यवहार, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट, ई-मेल अशा प्रकारच्या साधनांतून प्रकाशित होते. माहिती आपल्याला हवी तेवढी आपण एकत्र करुन आपल्यासाठी घेणे आवश्यक असते.

अशीच माहिती इंटरनेट मधून मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत असते म्हणून इंटरनेटला 'माहितीचा सागर' असे म्हणतात. ह्या माहितीच्या सागरात अनेक ठिकाणाहून वेगवेगळ्या प्रकारची माहिती एकत्रित केली जाते. ह्यात अनेक विषय एकत्र आलेले असतात. एका विषयावर लाखो वेबसाईटस् ह्या माहिती देत असतात. ती माहिती प्राथमिक स्वरुपाची असते.

उदा :- अर्थशास्त्र या विषयावरील माहिती हवी असेल तर, इंटरनेटच्या सर्च मशिनमध्ये Economics हा Keyword दिला तर लाखो वेबसाईट येतात.

या साईट मधून आपल्याला युरोपियन अर्थशास्त्र, भारताचे अर्थशास्त्र, महाराष्ट्राचे अर्थशास्त्र इत्यादी विषय निश्चित करावे लागतील. पुन्हा अर्थशास्त्र हा विषय संस्थेच्या, बँकेच्या कारखान्याच्या संदर्भात आहे का ? ते निश्चित करुन मग Keyword दिला असता लाखो वेबसाईट मधून गाळून ५०-६० वेबसाईट मिळतात. या वेबसाईटमध्ये आपल्याला हवी असलेली माहिती कुठे आहे ते वेबसाईट उघडून पाहावी लागेल. व त्या वेबसाईटमधून हवी असलेली माहिती गोळा करुन एकत्र ठेवावी लागेल. अशा प्रकारे माहिती एकत्रित करुन मग तिचे संघटन हे रचनात्मकदृष्ट्या करता येईल. माहिती प्रत्येक वाचकाच्या दृष्टीकोनानुसार गोळा करुन दिली जाते. वाचकांच्या दृष्टीने जेवढी माहिती त्याला गरजेची आहे. तेवढ्याच माहितीची अपेक्षा करतो म्हणून प्राथमिक स्वरुपाची माहिती देताना ती नेमकीच व विषयाच्या संदर्भात असली पाहिजे. [१७]

३.४ पुनर्संघटनाची व्याख्या :-

"विशिष्ट विषयाची विविध प्रलेखांमध्ये उपलब्ध असलेली माहिती उपभोक्त्याला सहजपणे समजेल, वाचता येईल, उपयोग करता येईल अशा स्वरुपांत सादर करणे म्हणजे पुनर्संघटन होय."

एकत्रित केलेली माहिती पुनर्संघटनाद्वारे उपभोक्त्यांना उपयुक्त ठरेल अशा पद्धतीने मांडणी केली जाते. [१८]

३.५ पुनर्संघटन कसे करतात - महत्त्व

पुनर्संघटन करताना विषयाचा आवाका लक्षात घेतला जातो. तसेच त्या विषयाचा संदर्भ कोणकोणत्या विषयांशी येतो हे लक्षात घेतले जाते. त्याचप्रमाणे, माहिती मागणारा वाचक हा कोणत्या प्रकारच्या गटात जातो याचा विचार केला जातो.

---

तळटीप : - १७. Chatterjee, Amitabha : Information Analysis Consolidation and Repakaging, Dept. of Librarary and Information Science, JadhavaPur University., Calcutta.

उदा : डॉक्टर, वकिल, संशोधक, शिक्षक - प्राध्यापक, इत्यादी. हे पाहणे गरजेचे असते. प्रत्येक वाचकाची गरज ही वेगवेगळी असते. त्या गरजेनुसार माहितीचे पुनर्संघटन करावे लागते.

पुनर्संघटन करताना प्रथम प्राथमिक स्वरुपाची माहिती एकत्र केली जाते. ही माहिती एकत्रित करुन संघटन व रचनात्मकदृष्ट्या लावली जाते. मग आपल्या वाचकाला माहिती कुठल्या प्रकारची हवी आहे. ती माहिती ठेवून नको त्या स्वरुपातील माहिती काढून टाकली जाते व पुन्हा त्या माहितीची रचना केली जाते व ती माहिती वाचकांना दिली जाते. यालाच ''माहितीचे पुनर्संघटन'' म्हणतात.

उदा. १) संशोधक हे सतत संशोधन करत असतात. त्या संशोधकांना खूप मोठ्या माहितीच्या महासागरातून छोट्याशा विषयाची माहिती हवी असते. तो संशोधक तेवढ्याच माहितीची अपेक्षा करत असतो. संशोधकाला खूप वेळ घालवून माहिती शोधणे शक्य नसते. कारण संशोधकांना वेळेचे महत्त्व असते. त्यांना एखाद्या संशोधनांसाठी खूप वेळ घालविता येत नाही. कारण एकाच विषयावर अनेक ठिकाणी संशोधन चालू असते, म्हणून त्यांना वेळेचे बंधन असते, अशा वेळी ते ग्रंथपालांजवळ माहिती मागतात. त्याचवेळी ग्रंथपालांनी माहिती शोधून त्या संशोधकाची गरज भागविणे म्हणजेच पुनर्संघटन होय.

पुनर्संघटनामुळे वेळ वाचतो, त्यामुळे वाचकांचे कष्ट वाचतात. नेमक्या वेळी नेमकी माहिती मिळते.

उदा. २) एखाद्या व्यक्तीला परदेशी शिक्षण घ्यावयास जावयाचे असते. अशावेळी ती व्यक्ती देश निश्चित करते त्या व्यक्तीला अमेरिकेला शिक्षणासाठी जावयाचे आहे. इंटरनेटवर अमेरिकेची माहिती खूप मोठ्या प्रमाणावर आहे. ती पूर्ण माहिती घेऊन त्यातील विद्यापीठांची माहिती वर्णानुक्रमे लावून देणे म्हणजेच पुनर्संघटन होय.

तळटिप :- १८. Saracovic, T. and wood, J.S.: Cdnsolidanion of Information : A Handbook of Evalution, Restructing and Repackaging of Scientific and Technical Information, Paris, UNESCO, 1981.

**समारोप :-**

मानव हा इतर प्राण्याप्रमाणेच प्राणी आहे. परंतु, इतर प्राण्यांपेक्षा मानव हा बुद्धिशाली प्राणी असल्याने त्याने निसर्गात उपलब्ध अन्न हे परत परत मिळवण्याचे श्रम न करता शेतीच्या माध्यमातून परत मिळवू लागला. निसर्ग निर्मित आगीचा शोध लावला. व अन्नावर प्रक्रिया करुन खाऊ लागला त्यानंतर १३व्या व १४व्या शतकाच्या काळात मानवाने यंत्राचा शोध लावला. व याच काळाला 'यांत्रिक युग' असे संबोधले जाऊ लागले.

याच काळात गुटेनबर्ग याने छपाईचा शोध लावला. त्यानंतर ५०-७५ वर्षाच्या काळात यांत्रिक युगाची क्रांती झाली. याच काही वर्षात कधीच शोध लागले नव्हते ते लागले व हे शोध युद्धासाठी होणाऱ्या तयारीतून लागले.

या नंतर जगात एक स्फोट झाला. या स्फोटामुळे जगात अनेक प्रचंड व धक्कादायक लाटा उसळल्या या लाटांमुळे समाजात अनेक बदल झाले. यात सांस्कृतिक, सर्वसामान्य लोकांची जीवन पद्धती, शेती, यांत्रिक युग या सर्व क्षेत्रात पटापट बदल होत गेले. जगातील लोकांच्या संपूर्ण जीवनात बदल झाले. ह्या लाटा म्हणजेच, दुसरे व तिसरे महायुद्ध होय. या महायुद्धामुळे औद्योगिक क्रांती फार मोठ्या प्रमाणात झाली याच काळात कॉम्प्युटरचा शोध लागला व कॉम्प्युटरचे युग आले. त्यानंतर सर्व क्षेत्रात तंत्रज्ञानाचे उपयोजन झाले.

शेतीवर माणूस ह्याच काही वर्षात जास्तीत जास्त अवलंबून होता. त्यामुळे तो आपल्या वस्तू विकण्यासाठी बाजारात जाऊ लागला याच वेळी त्याला माहितीची गरज लागली. या गरजेतून माहिती माध्यम क्रांती झाली. याच

काळात प्रत्येकाला माहितीची गरज भासू लागली व प्रत्येक जण माहितीच्या युगात वावरू लागले.

याच काळात छपाईचा शोध लागल्याने माहितीचा प्रसार हा मोठ्या प्रमाणात झाला. कारण छापील माहिती मिळाल्याने ती माहिती वाचणे व साठवून ठेवणे सोपे जाऊ लागले. या छपाईमुळे नवीन माहिती उपलब्ध होत होती. त्यामुळे माहितीचा प्रसार व ज्ञानाचा साठा हा फार मोठ्या प्रमाणावर झाला. छपाईमुळे २० व्या शतकातील वैज्ञानिक, तांत्रिक प्रगतीत फार मोठी भर पडली. माहितीची जतन पुस्तके, मासिके व इतर मुद्रित साहित्य याद्वारे केले जाते व मुद्रित साहित्याच्या रुपाने समाजातील कनिष्ठ स्थरापर्यंत पोचवले जाते. त्यामुळे समाज मोठ्या प्रमाणावर साक्षर झाला. या ज्ञानप्रसारणासाठी मुद्रणाची फार मोठ्या प्रमाणावर मदत झाली.

त्यानंतर माहितीचा प्रसार हा संगणकाच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर झाला यात इलेक्ट्रॉनिक माहितीची संकल्पना आली व माहितीच्या युगात माहितीचे संक्रमण फार मोठ्या प्रमाणावर झाले याच काळात माहिती एकत्र करुन संप्रेशन करु लागले. याच वेळी माहिती शास्त्राचा उदय झाला.

नवीन विचार प्रकट होऊ लागले व या विचारांना माहिती शास्त्र प्रसिद्धी देऊ लागले. यालाच माहिती म्हणतात. यानंतर माहिती शास्त्रात अनेक शास्त्रातील संकल्पना ह्या आल्या आहेत.

माहिती व तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे माहिती व्यवस्थापन होऊ लागले. व त्यामुळे उत्पादक व मध्यस्थ हे ज्ञानसाठ्याचा उपयोग करुन माहितीत बदल घडवून ती माहिती प्रसारित करु लागले. प्रत्येक संस्थेला माहिती लागते. त्या माहितीचे व्यवस्थापन करुन त्याचा उपयोग करुन संस्था फायदा मिळवू लागल्या. माहिती व्यवस्थापन ही संकल्पना गुंतागुंतीची आहे. त्यामुळे संस्थांना अंतर्गत व बाह्य ह्या दोन्ही प्रकारची माहिती एकाच वेळी मिळू शकते. माहितीचे व्यवस्थापन मशीन बेसवर केले जाते म्हणजेच संगणकाच्या साहाय्याने केले जाते. माहिती व्यवस्थापन हे एकत्रीकरण, संघटन, पुनर्संघटन, विपणन या चार टप्प्यात केले जाते.

माहिती एकत्रित करुन ठेवली जाते. त्यातून तात्काळ निर्णय घेता येतात, प्रश्नांची सोडवणूक करता येते, हवी असलेली माहिती निवडून घेतली जाते. माहितीचे विश्लेषण करुन ज्ञानात रुपांतर करता येते. तसेच लोकांच्या उपयोगासाठी संग्रहीत करुन ठेवली जाते. संक्षिप्त स्वरुपात माहिती एकत्र करुन ठेवता येते या माहितीचा उपयोग अशा प्रकारे केला जातो.

माहिती एकत्रित करुन ठेऊन ग्रंथपाल माहिती सेवा केंद्रावरुन माहिती लोकांना देऊ लागले व एकत्रीकरण, संकलन करुन ठेऊ लागले. त्याचबरोबर माहितीच्या एकत्रीकरणाचे मूल्यांकन करुन ठेवणे गरजेचे वाटू लागले. त्यामुळे ही प्रक्रिया करुन वाचकांना माहिती पुरवू लागले. ही माहिती वापरणे, संप्रेषण करणे या गोष्टी संगणकामुळे खूप वेगात घडल्या व त्यामुळे जगातील कानाकोपऱ्यातील माहिती ही माणसांना मिळविणे शक्य झाले आहे.

एकत्रीकरण व पुर्नसंघटन ह्या प्रक्रिया एकमेकांना पूरक आहेत. या प्रक्रियांमुळे लोकांना माहिती मिळवणे व ती वापरणे शक्य झाले आहे. कारण एकत्रीकरण ह्या प्रक्रियेत माहिती एकत्र करुन तिची शब्द कोशाप्रमाणे रचनाही करुन ठेवली जाते. शब्द कोशात ज्याप्रमाणे शब्द शोधतात त्याप्रमाणे ही माहिती शोधली जाते. ही माहिती मिळवण्यासाठी जास्त वेळ खर्च होत नाही. ही सहज उपलब्ध होते. त्याचप्रमाणे पुर्नसंघटनामुळे माहिती जी वाचकाला नेमकी हवी ती दिली जाते. म्हणजेच वाचक कोणत्या गटातील आहे. त्याचा माहिती वापरण्याचा दृष्टीकोन व विषयाची व्याप्ती या गोष्टीचा विचार करुन

माहिती एकत्रिकरणातून माहितीचे पुर्नसंघटन करुन ही माहिती दिली जाते. त्यामुळे वाचकाचा वेळ व वाचकाचे बौद्धीक श्रम वाचतात. त्याचबरोबर एकाच प्रकारच्या माहितीसाठी अनेक वाचकांचा वेळ व श्रम वाचतात. कारण एकाच प्रकारच्या माहितीची गरज़ अनेकांना सतत लागत असते.


**संदर्भ सूची : -**

**मराठी ग्रंथ : -**

१. टॉफलर, अल्विन : तिसरी लाट, मोहिते, शरदिनी, अनु., महाराष्ट्र राज्य आणि सांस्कृति मंडळ, प्रथम आवृत्ती, १९९१.

२. जोशी, लक्ष्मण शास्त्री, संपा. : मराठी विश्वकोश खंड १३, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, १९८७.

३. नगुंदे, रेवती : प्रलेख व आणि माहिती शास्त्र तत्वे, तंत्रे, पद्धती, केंद्र आणि विकास, पुणे. युनिव्हर्सल प्रकाशन दुसरी आवृत्ती, २०००. पृ. ९४

**नियतकालिके : -**

१. केतकर, कुमार : टेक्नॉलॉजी नावाची सिस्टिम, लोकसत्ता, २२/१०/०५, शनिवार.

२. रिसवडकर, म. रा.: इन्फॉर्मेशन ॲण्ड कमॉडीटी, ज्ञानगंगोत्री, वर्ष पहिले, सप्टेंबर-नोव्हेंबर, २०००. अंक २.

३. पौडवाल, सुषमा : ज्ञानाचे अग्रदूत, ज्ञानगंगोत्री, वर्ष पहिले, सप्टेंबर-नोव्हेंबर, २०००. अंक

**इंग्रजी**

१. Kamal Vijayan : Knowledge and Information Management, Delhi. 1st ed.: Macmillal, 2004.

**नियतकालिके : -**

1. Chatterjee, Amitabha : Information Analysis Consolidation and Repakaging, Dept. of Librarary and Information Science, JadhavaPur University., Calcutta.



**श्रीमती स्वप्ना बाबुराव वर्तक**
श्री मंगेश अपार्टमेंट, रुम नं. १०१,
साईनाथ नगर, बोरिवली (प.)


पृष्ठ क्र. २१ वरुन

**युगाचा मंत्र**

तुमचे उत्पादन खरेदी केल्याने काहीतरी मूल्य मिळत आहे. असे ग्राहकाला वाटले पाहिजे. वस्तूच्या किमतीपेक्षा त्याची मौलिकता महत्त्वाची आणि तो ग्राहकाच्या मनावर ठसविली पाहिजे. जागतिक मान्यतेचा ''ब्रॅण्ड'' तयार करणे हेच भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्यासमोर सर्वांत मोठे आव्हान आहे. हे उत्पादन भारतातून आलेले आहे, असे अभिमान सांगणारे ग्राहक आपल्याला जगात निर्माण करायचे आहेत. मार्केटमध्ये ''ब्रॅण्ड'' स्थिरावला की पैशाची आवक सुरु होते. नफा मिळतो, उत्तम ग्राहक आकर्षित होतो, कुशल कर्मचारीवर्ग आकृष्ट होतो, त्यामुळे मोठे गुंतवणूकदारही पुढे येतात. हे सर्व चक्र चालू करण्याची क्षमता ''ब्रॅण्ड'' मध्ये असते. म्हणून ''ब्रॅण्ड इक्विटी'' वर ताकद खर्च करावी लागते.

**शब्दांकन श्री. प्रशांत दीक्षित**
ठाणे.
सौजन्य- 'सकाळ'

# शाळा ते महाविद्यालय - प्रवासातील विद्यार्थी

*महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची काही निरीक्षणे या लेखात मांडली आहेत. त्याच्या व्यक्तिमत्वाच्या प्रवासात जडणघडणीत कार्यरत असणारे घटक, त्याचे शालेय वय व नंतर पौगंडावस्थेत आल्यानंतरचे जग याविषयीची ही काही निरीक्षणे आहेत. तसेच व्यक्तिमत्व या संकल्पनेचा अर्थ व लक्षणे यांचाही विचार केला आहे. - संपादक*

## शिक्षण - काही व्याख्या

शिक्षण प्रक्रियेत अनुभवी अशा अध्यापकाकडून अननुभवी अशा विद्यार्थ्यांना शिकविले जाण्याच्या प्रक्रियेचा समावेश होतो. हे लक्षात घेता शिक्षणाच्या असंख्य व्याख्या आजवर अनेक शिक्षण तज्ज्ञांनी, समाज शास्त्रज्ञांनी, तत्वज्ञांनी केलेल्या आढळतात. त्यापैकी काहींचा येथे उदाहरणादाखल विचार करु.

१) स्वामी विवेकानंद - विवेकानंदांच्या मते शिक्षण हे मनुष्यातील चांगले जीवन जगण्याच्या शक्यता वाढवू शकेल असे साधन आहे. त्यांनी मोजक्या शब्दात शिक्षणाची व्याख्या करताना म्हटले आहे, ''Education is the manifestation of the perfection already in man.'' शिक्षणप्रक्रियेचे एकूण आठ हेतू त्यांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

a) Education for character building.

b) Education for making people self reliant.

c) Education for developing spiritual life

d) Education for serving humanity

e) Education for developing and feeling of brother hood.

f) Education for developing spirit of renunciasion.

g) Education for attaining self suffience.

h) Education for physical development.

२) रविन्द्रनाथ टागोर - शांतिनिकेतन या संस्थेच्या माध्यमातून आश्रम पद्धतीच्या शिक्षण व्यवस्थेचा पुरस्कार करणारे थोर साहित्यिक विचारवंत गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर यांनी शिक्षणाचा अन्वयार्थ लावताना व्याख्या करण्याचा जो प्रयत्न केला तो असा "Education is nothing short of the highest purpose of man-the fullest growth and freedom of soul."

३) महात्मा गांधी - मूलोद्योगी शिक्षणपद्धतीचा पुरस्कार करणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नेते महात्मा गांधी यांनी केलेली व्याख्या "By education I mean an all round drawing out of the best in child and man-body mind and spirt."

४) R.N. Joshi - ख्यातनाम शिक्षण तज्ज्ञ व जागतिक शिक्षण पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करणारे विचारवंत RNJ आपल्या "Education eleswhere and here" या पुस्तकात म्हणतात, "Education helps a person in the unfolding of his personality by bringing forth and revealing the potential qualities in him. If develops the mind, the physique, the senses and the skills and nourishes the thinking qualities of the learner. It afbords a means for a person to earn his livilihood and also serve the society in serveral ways."

या व्याख्यांच्या पार्श्वभूमीवर आपल्या देशातील एकूण शिक्षण पद्धतीमध्ये ज्या पद्धतीने विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते त्या पद्धतीकडे दृष्टीक्षेप टाकला तर अनेक प्रकारची निरीक्षणे आपल्या ध्यानात येतात. उच्च शिक्षण घेण्यापूर्वी शालेय स्तरावर दिले जाणारे शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सुरुवातीच्या जीवनातील अनेक वर्षे व्यापणारे असते. आयुष्यातील १०/१२ वर्षे ज्या प्रक्रियेचा विद्यार्थी भाग असतो त्या शिक्षण प्रक्रियेतून विद्यार्थ्याला बरेच काही शिकायला मिळणे अपेक्षित असते.

शालेय जीवनातील प्राथमिक, माध्यमिक अशा दोन्ही स्तरांवरील विद्यार्थ्यांचे आज दिसणारे चित्र कसे आहे? संस्कारक्षम अशा या वयात विद्यार्थ्याला भेटणारे शिक्षक, त्यांच्याशी असणारे त्यांचे नाते, शाळेत अपेक्षित असणारे आश्वासक वातावरण, शालेय मित्रांचे विश्व या सर्व घटकांच्या वागण्याची अशी एक चाकोरी निर्माण होते की त्या संपूर्ण प्रक्रियेत एक प्रकारच्या आपलेपणाचा, कौटुंबिक जिव्हाळ्याचा अनुभव विद्यार्थी नक्की घेत असतो. लहानपणामुळे एकूण जगाविषयीच्या कल्पना स्पष्ट झालेल्या नसतात. व्यक्तिमत्त्व म्हणून जरी काही वेगळे असले तरी त्या व्यक्तिमत्त्वाला कंगोरे पडायला सुरुवात झालेली नसते. घरापासून आपण आई-वडिलांना सोडून जरी लांब असलो तरी आपल्या शिक्षकांजवळ आहोत, आपल्या मित्रांमध्ये आहोत असं एक सुरक्षिततेचा भाव विद्यार्थ्यांच्या मनात असतो. शाळेतील जग हेच काय ते सत्य हे त्याच्या मनात असते. अशी सुरक्षिततेची भावना त्याच्या मनात असण्यामागे शिक्षकाचे त्याच्याकडील वैयक्तिक लक्ष हे एक कारण असते. अगदी प्राथमिक स्तरावर, जेव्हा विद्यार्थी अनुकरणशील वयात असतो. तेव्हा शिक्षिका म्हणजे त्याच्या दृष्टीने सर्वेसर्वा असतात याचे कारण त्याच्यांत विद्यार्थी आपली आई अनुभवीत असतो. माध्यमिक स्तरावर विद्यार्थी येतो तेव्हा त्याच्यातील अनुकरणशीलता कमी होते तरीसुद्धा शाळा आणि शाळेचे जग यांच्याशी भावनिक दृष्ट्या विद्यार्थी बांधलेला असतो. आपली शाळा हा त्याच्या अभिमानाचा विषय असतो.

या शालेय शिक्षणाच्या विद्यार्थ्यांच्या वयात समाजातील इतर घटकांचाही त्याच्या नकळत त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडत असतो. आई, वडील, भावंडे यांच्याबरोबरच त्याच्या खास अशा जगातील मित्र, शेजारी, त्याचे वर्गशिक्षक, विषयशिक्षक या सर्वांचा त्याच्या जडणघडणीत वाटा असतो. याशिवाय दूरदर्शन सारखे प्रभावी माध्यमही त्याच्या जगाविषयीच्या कल्पनांना आकार देत असते. या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून विद्यार्थी घडत असतो.

परंतु या जडणघडणीच्या कालखंडात व्यक्तिमत्त्व विकासाला उपयुक्त ठरु शकणाऱ्या पुस्तकासारख्या साधनाचा, मैदानी खेळांचा, मनन चिंतन या मानसिक प्रक्रियांकडे विद्यार्थ्याला द्यावे तितके लक्ष देता येत नाही. शालेय जगातील सत्र परीक्षा, अंतिम परीक्षा यांचे चक्र, गृहपाठाचा अवाजवी ताण ही त्यामागील जशी प्रमुख कारणे आहेत तसेच गेल्या पन्नास वर्षात लोकसंख्येच्या केंद्रीकरणातून वाढलेला शहरीकरणाचा प्रचंड वेग हेही एक कारण आहे. यामुळे घरापासून ते शाळेपर्यंत व शाळेपासून ते घरापर्यंत आणि घरापासून ते शिकवणी, वर्गापर्यंत व तेथून पुन्हा घरापर्यंत असा प्रकार अनावश्यक प्रमाणात वाढला आहे. या प्रवासादरम्यान विद्यार्थ्यांच्या मनावर असणारे ताण अधिक वाढतात. याखेरीज स्पर्धेच्या चुकीच्या कल्पनांनी येणारे झपाटलेपण हे ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासात अडथळा ठरत असते. याउलट आपल्या मुलाचे व्यक्तिमत्त्व याचा इतका बाऊ पालक काही वेळा करतात की त्याकरिता त्या विद्यार्थ्यांवर ते कायम दडपण टाकत असतात.

शालेय स्तरावरील ही निरीक्षणे पाहिल्यानंतर शिक्षण कशासाठी घ्यायचे याच्या पालकांच्या कल्पना स्पष्ट नसतात

हेच प्रामुख्याने जाणवतो. शिक्षणाच्या वर दिलेल्या व्याख्यांखेरीज 'शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास' ही व 'शिक्षण म्हणजे आतून बाहेर येण्याची प्रक्रिया असली पाहिजे. स्वत्त्वाचा विकास घडवून जे स्वत:ला ओळखायला शिकवतो ते शिक्षण होय." (जे. कृष्णमूर्ती व ओशो यांचे शिक्षण विषयक विचार ही फार मोलाचे आहेत) या व्याख्यांच्या संदर्भात शालेय शिक्षणाचे उद्देश्य नेमकेपणाने शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करता येईल. हे ठळक असे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

### शालेय शिक्षणाची उद्दिष्टे

१) किमान कौशल्ये आत्मसात करुन घेण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची जडणघडण करणे. ही कला कौशल्ये तरी का विकसित करावयाची तर, एक वा अधिक भाषांचे मूलभूत ज्ञान मिळविणे आणि त्या आधारे इतर जीवनाश्यक विषयांचा गाभा समजावून घेणे हे यामागील प्रमुख कारण आहे. भाषा हे संदेश वहनाचे, तसेच अभिव्यक्तीचे प्रमुख माध्यम असल्याने विद्यार्थ्यांतील भाषिक कौशल्यांचा विकास शालेय वयातील शेवटच्या तीन चार वर्षात वाटणाऱ्या विषय विशेषी करणाचा अभ्यास करण्याचे कसब विकसित करावयाचे असते. या सर्वातून विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची पूर्वतयारी साधणे हा महत्वाचा हेतू असतो. उच्च शिक्षणातल्या टप्प्यावर विद्यार्थ्यांचे व्यावसायिक वा इतर अभ्यासक्रमांकडे वळण्याचे मार्ग तयार होतात.

२. शालेय शिक्षणाचा दुसरा प्रधान हेतू म्हणजे ज्या समाजात, वातावरणात विद्यार्थी लहानाचा मोठा होतो, वाढतो त्या समाजाबद्दलची विद्यार्थ्यांची जाण वाढविणे यामुळे त्या समाजाचा तो विद्यार्थी क्रियाशील घेऊ शकतो.

३. या सर्व प्रक्रियेबरोबरच शिक्षणाचा आणखी एक उद्देश्य आहे. तो म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनात नैतिक मूल्यांची जोपासना करुन त्या अनुषंगाने त्याला त्याचे चारित्र्य व व्यक्तिमत्त्व घडविण्यास सहाय्य करणे. असे सहाय्य मिळाल्यामुळे विद्यार्थी समाजात पुढील आयुष्यात चांगला नागरिक म्हणून राष्ट्रीय विकासातील आपली भूमिका पार पाडेल.

आपल्याकडील शालेय शिक्षणात व्यक्तिमत्त्वाच्या क्रियात्मक व भावात्मक अंगांचा विचार केला जात नाही तर फक्त ज्ञानात्मक अंगांचा विचार अधिक प्रमाणात होत रहातो त्यामुळे महाविद्यालयात येणारा विद्यार्थी ढकलून दिल्याप्रमाणे भांबावल्या चेहऱ्याने येतो हे सर्व विवेचन ज्या शालेय जीवनासंबंधात आहे त्या शाळेची व्याख्या पाहून मग पुढील टप्प्याकडे वळणे योग्य ठरेल.

School - An institution for instruction; also the building in which it is homed. The term is used mainly for educational institution before the college level.

### उच्च शिक्षणाचे हेतू

वर दिलेल्या व्याख्या शिक्षणाचा शालेय व महाविद्यालयीन असा दोन्ही स्तरावरील अर्थ सामावणाऱ्या आहेत. मात्र शालेय शिक्षणाचे वर दिलेले हेतू व महाविद्यालयीन शिक्षणाचे हेतू यात फरक आहे. हे उद्देश्य थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) कुमार वयीन टप्पा ओलांडून पौगंडावस्था वा युवावस्थेत प्रवेश करणाऱ्या युवा युवतींना विविध ज्ञान शाखांची अधिक व्यापक व सखोल अशी जाणीव करुन देणे.

२) अनेक कारणांनी ठळकपणे लक्षात येणारे विद्यार्थी हेरुन त्यांना त्यांच्या आवडीच्या विविध ज्ञानशाखातील प्रगत अभ्यासासाठी प्रेरणा देणे व तयार करणे. उदा. एखादा विद्यार्थी उत्तम अभिनय गुण असणारा असतो. त्याच्यातील सुप्त अभिनय गुणांना पोषक ठरतील अशा चळवळींची संधी त्याला देणे व त्यातून विशिष्ट क्षेत्राकरिता त्याला तयार करणे.

३) औपचारिक शिक्षण देऊन त्या शिक्षणाच्या माध्यमातून विविध प्रकारच्या संस्थांचा कार्यभार उचलण्याच्या क्षमता विद्यार्थ्यांत वाढविणे. त्यांच्या आवडीनुसार या दृष्टीने विषयनिवडीचे स्वातंत्र्य देऊन त्यांना तशा संधी निर्माण करुन देणे. व्यावसायिक क्षमता असतील तर त्या क्षमतांचा विकास करणे.

४) यातून राष्ट्राच्या उत्तम नागरिकत्वाची तयारी करुन घेणे.

५) शिक्षणेतर अशा अनौपचारिक उपक्रमांमधून त्याच्यातील सुप्त गुणांचा अंदाज त्याला देता आला पाहिजे. त्या दृष्टीने संधी उपलब्ध करुन देणे हाही उच्च शिक्षणाचा हेतू असला पाहिजे.

**प्रत्यक्षात उच्च शिक्षणाच्या टप्प्यावर**

शालेय शिक्षण संपवून उच्च शिक्षणाकरिता महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांबाबतची निरीक्षणे पाहणेही आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांत प्रमुख असे दोन बदल झालेले असतात व या बदलातून याचे व्यक्तिमत्त्व जात असताना येणाऱ्या अनुभवांमुळे एक प्रकारचे भांबावलेपण त्याच्यात आलेले असते.

१) **मानसिक व शारीरिक बदल** - वयाच्या १४-१५ वर्षांच्या टप्प्यावर विद्यार्थी जीवनात होणारे मानसिक बदल अतिशय सूक्ष्म असतात. त्याची आयुष्याची जाण विकसित व्हायला सुरुवात होणार असते. यात आपण पुढे काय करायचे, काय करु शकणार आहोत, उपलब्ध संधी कोणत्या आहेत, आपली आवडनिवड काय आहे अशा अनेक गोष्टींचा समावेश असतो. भावनिक स्तरावर तो आई वडिलांपासून काहीसा दुरावण्यास सुरुवात होते. याचे कारण त्याची स्वत:ची मते बनत असतात व येथूनच दोन पिढीत अंतर पडायला सुरुवात होते. परिणामत: विद्यार्थ्याला समवयीन मित्र अधिक जवळचे वाटायला लागतात. त्यांच्याशी त्याची मते पटावयास लागतात. त्याच्यासमोर असणारे भविष्य त्याला स्वातंत्र्याची वेगळी जाणीव करुन देते व विद्यार्थी स्वप्नाळू बनतात.

या मानसिक बदलाबरोबरच त्याच्यात होणारे शारीरिक बदलही त्याला अस्वस्थ बनवायला सुरुवात करतात. शरीरातील लैंगिक बदल, आवाजातील बदल यातून त्याला आता आपण मोठे झालो या भावनेने सर्वांपासून आपण वेगळे आहोत याची जाणीव करुन देतात. या पृथगात्मतेतून व्यक्तिमत्त्वाच्या वेगळेपणाचा गंड त्याच्यात निर्माण होतो. मानसशास्त्र या अवस्थेचा पौंगडावस्था असा उल्लेख करतात.

२) **बाह्य जगातील बदल** - शालांत परीक्षेनंतर विद्यार्थी जेव्हा उच्च शिक्षणाच्या हेतूने महाविद्यालयात येतो तेव्हा त्याचे सर्व जग बदलते. आतापर्यंत शालेय शिस्तीच्या ज्या करड्या सवयी लागलेल्या असतात त्या बदलायला सुरुवात होते. महाविद्यालयाचे मोठ्या आकाराचे वर्ग, वर्गातील विद्यार्थी संख्या, वेळापत्रकाची पद्धत याचबरोबर आजवरचा शिक्षकांचा अनुभवही बदलायला सुरुवात झालेली असते. शालेय जगात असणारी कौटुंबिक निरागसता, आपलेपणा याची उणीव या जगात असते. काही अडले तर शिक्षकाला विचारता येण्याची त्याची शालेय शिक्षण प्रक्रियेतील व्याख्यान पद्धतीमुळे त्याला विसरावी लागते. काही अडले तर त्याचे त्याला शोधावे लागते. शालेय शिक्षक आणि महाविद्यालयातील शिक्षक यांच्यातील बौद्धिक पातळीतील फरकही त्याला जाणवायला सुरुवात होते. शाळेत शिक्षकाशी असणारे त्याचे व्यक्तिगत, व्यक्तिसापेक्ष संबंध व्यक्तिनिरपेक्ष बनतात.

जो तुटकपणा, कोरडेपणा त्याला जाणवतो त्याच्या परिणामस्वरुप महाविद्यालयाच्या पहिल्या दुसऱ्या वर्षात ज्ञानार्जनाच्या कक्षा रुंदावल्यामुळे एक तर विद्यार्थ्याला अभ्यासाची गोडी लागू शकते, तो अधिक चौकस बनू

शकते किंवा मित्रांच्या शोधात असणारे त्याचे मन चांगले मित्र न मिळाल्यास गैरमार्गाचाही अवलंब करु शकतो. हे दोन्ही परिणाम होण्यापूर्वी त्याची अवस्था चुकलेल्या वासरु सारखी असते गोंधळलेली असते.

याच सुमारास काही नैमित्तिक घटक ही त्याच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम घडवून आणू शकतात. उदा. महाविद्यालयाचा लौकिक हा एक असा घटक आहे. महाविद्यालय शिक्षण घेण्याच्या दृष्टीने, शैक्षणिक वातावरणाच्या दृष्टीने खूप चांगले असू शकते. महाविद्यालयात किमान गरजेच्या अशा सर्व सोयी ही असतात परंतु विद्यार्थी गुणवत्ता यादीत न आल्याने व अन्य तत्सम कारणामुळे महाविद्यालयाचा समाजात लौकिक नसतो. उलट अशाच स्वरुपाच्या काही कारणांमुळे शैक्षणिक वातावरण नसलेल्या महाविद्यालयाचा समाजात मोठा लौकिक असतो. अशा लौकिकाचा विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होऊ शकतो. मोठ्या अपेक्षेने लौकिक असणाऱ्या महाविद्यालयात पालक विद्यार्थ्याला प्रवेश घेऊन देतात पण लवकरच त्यांचा भ्रमनिरास होतो. मुंबईतील एका क्ष महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या एका विद्यार्थीनीचे पालक दोन तीन वर्षातच पस्तावले. त्या महाविद्यालयाचे नाव मोठे होते, इतिहास मोठा होता परंतु तेथे येणारे विद्यार्थी प्रामुख्याने श्रीमंत सुखवस्तु घरातील होते. अशा मित्र मैत्रिणींच्या सहवासाचा नेमका वाईट परिणाम त्या विद्यार्थीनीवर होऊन कुसंगतीमुळे तिच्यावर उध्वस्त होण्याची पाळी आली अर्थात वर म्हटल्याप्रमाणे हा अनेक नैमित्तिक घटकांपैकी एक घटक होय !

या सर्व निरीक्षणांबरोबरच वाढत्या वयाची आणखी एक बाब कार्यरत व्हायला सुरुवात झालेली असते. ती म्हणजे विद्यार्थ्याची निरीक्षण क्षमता वाढते. आपल्या आजुबाजूच्या समाजात काय चालले आहे, योग्य अयोग्यतेच्या कल्पना काय आहेत या सर्वांवर त्याच्या मनात उलट सुलट विचार अधिक वेगाने सुरु होतात. लोकशाही पद्धतीतील एक जो दोष असतो तो म्हणजे नागरिकांना आपल्या हक्कांची जाणीव प्रथम होते परंतु कर्तव्याबाबत ते उदासीन असतात. हाच दोष वाढत्या वयाच्या विद्यार्थ्यात निर्माण व्हायला सुरुवात होते. अमूक एक गोष्ट वाईट असते, ती करु नये असे सांगणारे जे असतात तीच घरादारातील महाविद्यालयातील मंडळी नेमके तेच करताना विद्यार्थी बघतो. या विरोधाभासामुळे तो अधिकच गोंधळात पडतो. हे सर्व जे वाईट आहे ते नष्ट झाले पाहिजे व ते मी केले पाहिजे हा विचार त्याला अधिक अस्वस्थ करतो. साहसाचे त्याला आकर्षण वाटू लागतो व याच दरम्यान चित्रपट माध्यमाचा त्याच्यावर प्रभाव पडायला सुरुवात होते.

महाविद्यालयातील शिक्षकांमध्ये असलेली तुटकपणाची वागणूक, आई वडिलांबद्दल वाटणारा दुरावा, महाविद्यालयातील कोणत्याही विभागाची वा घटकाची त्याच्याकडे बघण्याची उदासीन वृत्ती या सर्वांतून एकप्रकारचे एकाकीपणा त्याला जाणवायला लागतो. चित्रपटातील मारामारी करणारा नायक त्याला जवळचा वाटतो. त्या नायकात तो स्वत:ला पहायला लागतो व या चित्रपटाच्या आकर्षणातून तो वाहवत जाण्याच्या शक्यता वाढतात. राजकीय पक्षातील गुंडगिरीचे त्याच्या नकळत त्याच्याभोवती कडे पडते व दोन तीन वर्षात तो या कड्यात पूर्णत: अडकून पडतो.

या दुष्टचक्रात विद्यार्थी अडकायलाच नको असेल किंवा अडकलेला विद्यार्थी या चक्रातून बाहेर यावयाचा असेल तर महाविद्यालयातील वातावरणांत, व्यक्ती संबंधात अधिक आश्वासकता आली पाहिजे. विद्यार्थ्यांशी असणारी बांधिलकी शिक्षकांनी, शिक्षकेतर घटकांनी मानली पाहिजे. केवळ तासभर व्याख्यान देणे इतकेच आपले कर्तव्य नसून विद्यार्थी हा आपल्या जीवनाचा केंद्रबिंदू आहे हे शिक्षकाने मानले पाहिजे.

महाविद्यालयांच्या कार्यालयांमध्ये, इतर विभागांमध्ये शिक्षकेतर घटकांकडून मिळणारी वागणूक हा ही एक निरीक्षणातील महत्वाचा भाग आहे. **अपवादांची जाणीव ठेवूनही** असे म्हणावे लागते की अशा विभागातील शिक्षकेतर वर्ग सर्वसाधारणपणे पगारासाठी व रजांच्या फायद्यासाठी नोकरी करीत असतो. विशिष्ट वेळेच्या नंतर विद्यार्थी आला तर त्याला महाविद्यालयांच्या कार्यालयातून मिळणारी वागणूक अतिशय हेटाळणीची असते. विद्यार्थ्याला त्याची म्हणून काही बाजू असते, ती निदान समजावून घ्यावी इतकाही उपचार पाळला जात नाही. उलट त्याला हेटाळणीच्या स्वरात घालवून दिले जाते. सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे घरापासूनचा प्रवास हा ताण देणारा असल्याने विद्यार्थ्याला कदाचित उशीर होऊ शकतो. परंतु कोणत्याही कारणाची मीमांसा न करता घालवून दिले की झाले अशा पद्धतीने विद्यार्थ्यांशी वागणारी ज्याला कारकुनी वृत्तीची माणसे म्हणता येतील ती बहुसंख्य कार्यालयात कोरडेपणाने काम करतात.

एखाद्या शासकीय व खाजगी संस्थेच्या कार्यालयातील काम व महाविद्यालयीन विभागांतील कार्यालयातील काम यात मूलभूत फरक असा असतो की अशा कार्यालयांचा संबंध मृत अशा फायलींशी, कागद पत्रांशीच प्रामुख्याने येतो. महाविद्यालयात मात्र आपल्या व्यवसायाचा कामाचा केंद्रबिंदू जिवंत तरुण असे विद्यार्थी असतात. त्यामुळे या चित्रात आमूलाग्र बदल करावयाचा झाल्यास या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण करावे लागेल, त्यांचे विविध स्तरावरील प्रश्न व त्या प्रश्नांची तीव्रता कमी करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करावे लागतील.

महाविद्यालयातील इतर विभागांच्या तुलनेत विद्यार्थ्याला समजावून घेऊन त्याला आश्वासक वातावरण उपलब्ध करुन देणारा महत्त्वाचा विभाग म्हणजे ग्रंथालय होय. इतर विभागांच्या तुलनेने ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वृत्ती ही अधिक सेवाभावी असते, असणे अपेक्षित असते शिवाय ग्रंथांच्या अस्तित्त्वाचा एक वेगळा परिणाम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वावर होऊन ज्ञानार्जनाची, वाचनाची त्याची इच्छा त्यामुळे प्रेरित होऊ शकते. या दृष्टीने ग्रंथपालाची अशी वेगळी जबाबदारी, भूमिका निर्माण होते.

आता ज्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात हा निरीक्षणांचा भाग होता त्या व्यक्तिमत्त्वाचा विचार येथे करु.

**व्यक्तिमत्त्व**

Personality हा शब्द मूळ लॅटिन भाषेतील Persona या शब्दापासून बनला आहे. Persona याचा अर्थ मुखवटा Among the Greeks, across used a mask to hide their identing on stage. This dramatic technique was later adopted by to Romans to whom 'persona' devoted "as one appears to others", not as one actually is. यामुळे व्यवहारात हा शब्द बऱ्याच सैलपणाने वापरला जातो. एखाद्याचे दिसणे, त्याचा इतरांवर होणारा कमी जास्त प्रभाव याचा उल्लेख सर्वसाधारणत: व्यक्तिमत्त्व असा केला जातो. हाच शब्द चारित्र्य या अर्थानेही वापरण्याचा प्रघात आहे. व्यक्तिमत्व या शब्दाची व्याख्या करताना प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ जी. डब्ल्यू. ऑलपोर्ट याला १९३७ पर्यंत या शब्दाच्या विविध अशा ५० व्याख्या केल्याचे आढळून आले. त्यानंतरच्या आजवरच्या या विषयावरील साहित्यात अनंत व्याख्या करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. या सर्व व्याख्यांच्या तपशीलात शिरण्यापेक्षा सर्वसंमत (widely accepred) व सर्व समावेशक अशा हार्वर्ड विद्यापीठातील late Gorden w Allport यांची व्याख्या पाहता येईल. इतर सर्व व्याख्या थोड्या फार फरकाने याच व्याख्येच्या आधारावर केलेल्या आहेत. "Personality is the dynamic organization within the individual of those pschyo physical systems that determine his characteristic behaviour and thoughts."

वरील व्याख्येच्या संदर्भात व्यक्तिमत्त्व या

संकल्पनेचा विचार करत व्यक्तिमत्त्व हे अनेक घटकांच्या एकत्रित परिणामातून संपन्न होत असते हे लक्षात येईल. यात गुणसूत्रे, जीव रसायन शास्त्र, वंश परंपरा यासारखे जीवशास्त्रीय घटक जसे कार्यरत असतात तसेच कुटुंब, शाळा, संगत, संस्कृती असे सामाजिक स्वरुपाचे घटकही असतात. हे सर्व घटक लक्षात घेऊन व्यक्तिमत्वाची पुढील काही प्रमुख लक्षणे सांगता येतील.

१) व्यक्तिमत्त्व हे परिस्थितीशी झालेले समायोजन आहे - व्यक्तिमत्व वर्तनातूनच प्रकट होते. हे वर्तन म्हणजे परिस्थितीच्या संदर्भात व्यक्तीने प्रकट केलेली प्रतिक्रिया होय. समायोजन याचा अर्थ परिस्थिती आणि प्रतिक्रिया यामध्ये सुसंवाद साधणे. उदा. थंडी वाजताच उबदार कपडे घालणे हे परिस्थितीशी समायोजक होय. अशा समायोजनाच्या नित्य गरजेतून प्रतिक्रियांच्या ज्या सवयी निर्माण होतात त्यांना व्यक्तिमत्वात समाविष्ट करावे लागेल.

२) व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीच्या वागण्याचे वेगळेपण होय - कोणतीही दोन माणसे सारखी नसतात. प्रत्येकाचा वंश वेगळा तशीच परिस्थितीही भिन्न असते. या दोहोंचा असाधारणतेतून (Uniquenus) व्यक्तीभेद निर्माण होतात.

३) व्यक्तिमत्त्व हे वर्तनाचे सातत्य आहे - जी शारीरिक व मानसिक वैशिष्ट्ये व्यक्तीच्या वर्तनातून विविध प्रसंगी सुसंगतपणे आढळून येतात त्यांनाच Personality trains असे म्हणतात. वेगवेगळ्या परिस्थितीत व्यक्ती कशी वागते ते पाहून स्थिरपणाने वर्तनात आढळणाऱ्या प्रतिक्रिया प्रकारांना तिच्या व्यक्तिमत्वात समाविष्ट करावे लागेल. या अर्थाने विशिष्ट गुणवैशिष्ट्यांचा व्यक्तींच्या ठायी नेहमी हा सुसंगतपणे होणारा आढळ म्हणजे व्यक्तिमत्त्व होय !

४) व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये दृश्य किंवा मोजता येण्यासारखी असतात. बुद्धिमत्ता, प्रेरणा, भावना, अभिवृत्ती, अभिरुची, अभिक्षमता (p p Attitudes) हे वर्तन विशेष वर्तनातून प्रकट होतात. विविध शोधप्रश्नांचे संच, वर्तन कसोट्या, मुलाखती, प्रश्नावली यांच्या आधारे ज्या वर्तन वैशिष्ट्यांचे मोजमाप करता येते त्यांना व्यक्तिमत्त्व वर्णन करताना महत्व द्यावे लागले.

५) व्यक्तिमत्त्व ही गतिमान संकल्पना आहे. व्यक्तिमत्त्व म्हणजे स्थिरावलेले वर्तनचित्र नाही, तर माणसाच्या वयाबरोबर बदलत जाणारी अशी ही संकल्पना आहे. व्यक्तिमत्त्व ही कालसापेक्ष व वय सापेक्ष संकल्पना आहे.

मोहन पाठक

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

*पुढील परिषद*

**आर्थिक गणित**

दि. २६ ऑगस्ट २००६

माहितीसाठी संपर्क - प्रा. आर. एस्. पोदार

गणित विभागप्रमुख, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

***आगामी परिषद***

नोव्हेंबर २००६

माहिती तंत्रज्ञान विभाग संयोजित

'लिनक्स, ठाणे २००६'

# परिसर वार्ता

## डॉ. वा. ना. बेडकर संशोधन व व्यवस्थापन संस्था



**श्री. नारायण मूर्ती**

'भारतीय बहु राष्ट्रीय कंपन्यांपुढील आव्हाने' या विषयावरील एक दिवसीय परिषद १७ मे २००६ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाली. विशेष म्हणजे उद्घाटनासाठी इन्फोसिसचे कार्याध्यक्ष व ख्यातनाम उद्योजक श्री. नारायण मूर्ती यावेळी उपस्थित होते. या वेळच्या भाषणात अनेक विषयांतर स्पर्श करीत ते म्हणाले ''देशाला पुढे जायचे असेल तर युवाशक्तीकडे अधिक लक्ष द्यावयास हवे. जगात भारताने काही वेगळे करुन दाखवले तर त्यामागे तरुणच असतील. आपली लोकशाही, निधर्मी दृष्टिकोण व युवाशक्ती याचा आपल्याला सार्थ अभिमान असावयास हवा''. यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

यावेळी उपसंहार करताना ॲपलॅब चे कार्याध्यक्ष श्री. पी. एस्. देवधर म्हणाले, देशात कोट्याधीश खूप आहेत पण या पैशाचा सर्वोत्तम उपयोग करणारे एकच आहेत ते म्हणजे नारायणमूर्ती.

या प्रसंगी व्यासपीठावर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडकर व संस्थेचे संचालक डॉ. गुरुप्रसाद मुर्ती हे ही उपस्थित होते.

## अभिनंदन !!!



**श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या निष्णात (M.Lib) अभ्यासक्रमाचे इ. स. २००५-२००६ या शैक्षणिक वर्षातील ठाणे अभ्यासकेंद्राचे विद्यार्थी श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये हे राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (SET) उत्तीर्ण झाले आहेत. ही परीक्षा २९ जानेवारी २००६ रोजी घेण्यात आली .

M.Lib चा अभ्यास करतानाच पहिल्याच प्रयत्नात त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

याच अभ्यास केंद्रातील माजी विद्यार्थी अनिल बनसोड हे (SET) देखील उत्तीर्ण झाले आहेत.

दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन !

### ग्रंथालयशास्त्र

जोशी बेडेकर महाविद्यालयाचा ग्रंथालयशास्त्र पदवी (मुंबई विद्यापीठ) निकाल ७१% इतका लागला आहे. मार्च मध्ये झालेल्या या परिक्षेत बसलेल्या एकूण ३७ जणांपैकी २ प्रथम वर्गात, १९ द्वितीय वर्गात तर ५ उत्तीर्ण वर्गात उत्तीर्ण झाले. नम्रता पै महाविद्यालयात प्रथम आली. विद्यार्थ्यांचा एकूण निकाल ५०% लागला.

२००६-०७ पासून महाविद्यालयात निष्णात (एम्.एल.आय.एससी.) परीक्षेसाठीचे वर्ग चालू होणार असून या संदर्भात संयोजक ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांच्याशी २५३८४५९१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### बांदोडकर महाविद्यालय

मार्चमध्ये झालेल्या उच्च माध्यमिक परीक्षेचा महाविद्यालयाचा निकाल ९८.२६% लागला.

परीक्षेस बसलेल्या ५३३ विद्यार्थ्यांपैकी ४८५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष प्राविण्यास १४५, प्रथम वर्गात २११, द्वितीय वर्गात ११०, उत्तीर्ण वर्गात १९ उत्तीर्ण झाले तर अनुत्तीर्णांची संख्या ४८ आहे.

महाविद्यालयातून मंगेश जाधव प्रथम (९०.५०%) प्रथम, मनीष हेगडे (९०.१७%) तर अमेय भोसेकर (९०%) हे प्रथम तीन क्रमांकांचे मानकरी ठरले.

#### विषयात प्रथम

| क्र. | विषय | नाव | गुण |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | ब्राबर जिज्ञासा | ८२ |
| २ | मराठी | प्रज्ञा नामजोशी | ८७ |
| | | स्वप्नाली परदेशी | ८७ |
| ३ | हिंदी | स्नेहा शहा | ७९ |
| ४ | संस्कृत | चैताली देशमुख | ९० |
| ५ | गणित | मंगेश जाधव | ९९ |
| ६ | भौतिकशास्त्र | गौरव साठे | ९९ |
| ७ | रसायनशास्त्र | मयुर नारखेडे | ९५ |
| | | विबोध गुरकुडकर | ९५ |
| | | हितेश पांगम | ९५ |

#### बोर्डात जीवशास्त्रात सर्वप्रथम

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | जीवशास्त्र | मोनिका कोरे | १०० |

#### बांदोडकर महाविद्यालयाचा पदवी वर्षाचा निकाल

प्रथम तीन विद्यार्थी

| विषय | विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|---|
| गणित | परब कविता सुरेश | ७१० |
| गणित | शेख निलोफर सुलेमान | ६७९ # १० |
| गणित | फुलोरे रत्नप्रभा भगवान | ६८० |
| रसायनशास्त्र | फर्नांडिस सिल्विया पॉली | ६८० |

जोशी बेडेकर महाविद्यालय

पुढील परिषद

**बायोएथिक्स्**

अर्थात

**जैवनीती**

या विषयावर

ता. २४-२५ जानेवारी २००७